MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सत्ताविसावे / अंक ५ / मे २०२६

## संपादकीय

## मराठी विज्ञान परिषदेचा हीरकमहोत्सव

मराठी भाषेतून विज्ञानाचा प्रसार करणारी मराठी विज्ञान परिषद नावाची एक संस्था मुंबई शहरात कार्यरत आहे. व्यवसायाने इंजिनीअर असलेले श्री. म. ना. गोगटे यांनी ही संस्था सुरू करण्यात पुढाकार घेतला. आपल्या काही समविचारी मित्रांबरोबर त्यांनी २४ एप्रिल १९६६ रोजी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. मुंबईच्या ताडदेव येथील एका घरात लावलेल्या या रोपट्याचे आता एका मोठ्या वृक्षात रूपांतर झाले आहे. काही वर्षांतच मुंबईच्या चुनाभट्टी परिसरात या संस्थेची एक स्वतंत्र वास्तू तयार झाली. सुरुवातीला मुंबईला एकच विभाग होता. ही संख्या वाढत जाऊन ती आता ६८ वर पोहोचली आहे. यातील काही विभाग तर महाराष्ट्र राज्याबाहेर देखील आहेत. सुरुवातीपासूनच या संस्थेला दिग्गज शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन लाभले आहे. डॉ. रा. वि. साठे, श्री. म. ना. गोगटे, प्रा. जयंत नारळीकर, प्रा. भालचंद्र उदगावकर, डॉ. वसंत गोवारीकर, श्री. प्रभाकर देवधर इत्यादी प्रतिथयश व्यक्तींनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले आहे. आजच्या घडीला प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ प्रा. जे. बी. जोशी संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत. श्री. अ. पां. देशपांडे यांनी सचिव पदाची जबाबदारी मागील अनेक वर्षे समर्थपणे सांभाळत आहेत. मराठी विज्ञान परिषदेच्या यशात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

विज्ञान प्रसाराचे विविध मार्ग मराठी विज्ञान परिषदेने चोखाळले. त्यातला पहिला आणि सोपा मार्ग म्हणजे विज्ञान विषयावरील व्याख्यान. विज्ञानाची जाण असलेले आणि विज्ञानाची तत्त्वे सोप्या भाषेत समजून सांगू शकतील असे वक्ते शोधून त्यांची शाळा किंवा महाविद्यालयात व्याख्याने आयोजित केली जातात. यांची पुढची पायरी म्हणजे प्रयोग दिग्दर्शन. या प्रकारात प्रयोग करून त्याची माहिती दिली जाते. या दोन्ही प्रकारच्या व्याख्यानांना शहरी, तसेच ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांनी चांगला प्रतिसाद दिला. मराठी विज्ञान परिषदेने विज्ञान प्रसाराचा स्वीकारलेला तिसरा मार्ग म्हणजे शंका समाधान. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, तशीच सामान्य माणसे यांच्या मनात अनेक प्रश्न असतात. या प्रश्नांची उत्तरे न मिळाल्याने त्यांची कुतूहल वृत्ती मारली जाते. हे होऊ नये त्यासाठी प्रश्नोत्तराचे कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थी प्रश्न विचारतात आणि त्याला तज्ज्ञ व्यक्ती लगेच उत्तर देतात असे या कार्यक्रमाचे स्वरूप असते. सोयीसाठी विद्यार्थ्यांचे प्रश्न आधी घेऊन, नंतर त्यातील निवडक प्रश्नांची उत्तरे दिली जातात. अशाच प्रकारचे अनेक कार्यक्रम मुंबई आकाशवाणीवर देखील सादर करण्यात आले आहेत. प्रश्नोत्तराचे कार्यक्रम शाळकरी मुलांना खूपच

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

आवडतात असा अनुभव आहे. या कार्यक्रमाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता ‘विज्ञान कुतूहल’ नावाचे एक सदर लोकसत्ता दैनिकाने सुरू केले. हे सदर मागील वीस वर्षे सतत सुरू आहे. यासाठी प्रत्येक वर्षी एक वेगळा विषय घेतला जातो. आत्तापर्यंत दैनंदिन जीवन, सागर संपत्ती, ग्रहणे, वातावरणीय बदल असे विषय हाताळले गेले आहेत. यासाठी वाचकांकडून प्रश्न मागवले जातात. त्यातील निवडक प्रश्नांची उत्तरे दैनिकाच्या सोमवार ते शुक्रवार या अंकात दिली जातात. अशा पद्धतीने एका वर्षात २५० हून अधिक प्रश्नांची उत्तरे दैनिकात छापली जातात. या सदराला वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मराठी विज्ञान परिषदेने बाळसे धरल्यानंतर या संस्थेचे एक मुखपत्र असावे असा विचार पुढे आला. ही कल्पना अनेक विज्ञान प्रसारकांनी उचलून धरली. त्यानुसार जानेवारी १९६७ पासून मराठी विज्ञान परिषद वार्तापत्र सुरू करण्यात आले. या वार्तापत्राचे मराठी विज्ञान परिषद पत्रिका असे नामांतर करून एप्रिल १९६८ पासून त्यांचे प्रकाशन सुरू केले. ते आजतागायत सुरू आहे. दरवर्षी ११ मासिक अंक आणि एक दिवाळी अंक प्रकाशित करण्यात येतात. पत्रिका प्रकाशनासाठी एक संपादकीय मंडळ नियुक्त केले आहे. प्रकाशनासाठी आलेल्या लेखांचे परीक्षण करून योग्य अशा लेखांचाच पत्रिकेत समावेश करण्यात येतो. त्यामुळे पत्रिकेत विज्ञान विषयांवरील दर्जेदार आणि माहिती पूर्ण लेखांचा समावेश होतो. हे सर्व अंक वाचनालयात, तसेच घरी संग्रहित ठेवावेत असेच असतात.

आपल्या देशात विज्ञानाचे अध्यापन प्रामुख्याने इंग्रजी भाषेतून केले जाते. त्यामुळे मराठी भाषेत लिहिलेली विज्ञान पुस्तके अगदी नगण्य होती. यावर मात करण्यासाठी विज्ञान पुस्तके निर्माण करण्याचे कार्य मराठी विज्ञान परिषदेने हाती घेतले. सुरवातीच्या काळात प्रतिथयश लेखकांकडून मसुदा लिहून घेऊन पुस्तके प्रकाशित केली. या क्षेत्रात जम बसल्यावर इतरही लेखकांना प्रोत्साहित करण्यात आले. आजच्या घडीला ५० हून जास्त पुस्तके मराठी विज्ञान परिषदेने प्रकाशित केलेली आहेत. तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीचा आधार घेऊन अलीकडच्या काळात काही पुस्तके डिजिटल स्वरूपात देखील प्रकाशित केली आहेत. जसजसे मराठी विज्ञान परिषदेचे नाव झाले तसतसे काही खाजगी प्रकाशक देखील हस्तलिखिताची मागणी करू लागले. ही मागणी पूर्ण करण्यासाठी मविपने निवडक लेखकांकडून काही पुस्तके लिहून घेतली आणि प्रकाशन गृहांनी ती प्रकाशित केली. काही महिन्यांपूर्वी पुण्याच्या विद्यार्थी गृह प्रकाशनाने एकापाठोपाठ एक अशी १५ पुस्तके प्रकाशित केली. या सर्व पुस्तकांना वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

‘वार्षिक संमेलनाचे’ आयोजन हा मराठी विज्ञान परिषदेचा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. वेगवेगळ्या गावात असलेल्या विभागांतील एक विभाग या संमेलनाचे यजमानपद स्वीकारते. त्या विभागाचे पदाधिकारी केंद्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या मदतीने संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करतात. संमेलनाचे अध्यक्षपद भूषवण्यासाठी एखाद्या प्रतिथयश वैज्ञानिकाला पाचारण केले जाते. डॉ. नारळीकर, डॉ. माशेलकर, प्रा. भा. मा. उदगावकर, प्रा. वि. गो. कुलकर्णी, डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. विजय भटकर अशा दिग्गज व्यक्तींनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषवले आहे. संमेलन काळात विज्ञान कार्यक्रमाची रेलचेल असते. त्यामध्ये प्रयोग दिग्दर्शन, प्रश्नमंजुषा, विज्ञान

(पृष्ठ क्र. २१ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक ५/मे २०२६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : ९१५२४८७७६५**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले राजगड | दिलीप नारायण वंडलकर | ३ |
| ३) | लोकमाता अहिल्याबाई होळकर - जीवन, कार्य, विचार आणि आजची प्रस्तुतता | सौ. साधना योगेश जोशी | ८ |
| ४) | कवितेचा आकृतीबंध | डॉ. आनंद कुलकर्णी | १६ |
| ५) | राजसा निजलास का रे! - डॉ. आनंद नाडकर्णी स्मरणलेख | डॉ. अमोल अन्नदाते | १९ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | २३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात


- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले राजगड

*'गडांचा राजा, राजांचा गड' असे राजगडाचे यथोचित वर्णन केले जाते. हिंदवी स्वराज्याच्या प्रथम राजधानीचा मान लाभलेला हा दुर्ग नुकताच युनेस्कोच्या 'जागतिक वारसा स्थळ' यादीत समाविष्ट केला गेला. जगालाही ज्याच्या स्थापत्य आणि पराक्रमाची नोंद घ्यावी लागली तो राजगड एक विस्तीर्ण दुर्ग आहे. संजीवनी, सुवेळा, पद्मावती या तीन नितांत सुंदर, पण तेवढ्याच अभेद्य माच्या आणि बलाढ्य बालेकिल्ला असा प्रचंड विस्तार असणाऱ्या राजगडाची थोडक्यात माहिती प्रस्तुत लेखात दिलेली आहे. – संपादक*

**किल्ले राजगड**




तोरणा घेऊन शिवबांनी स्वराज्याचे तोरण उभारले आणि त्याची दुरुस्ती सुद्धा सुरू केली. त्यामुळे शिवबाराजेंचे सवंगड्यांसह गडावर, तसेच आजूबाजूच्या परिसरात वरचेवर जाणे-येणे होऊ लागले. अशाच भटकंतीत ते एकदा तानाजी, सूर्याजी मालुसरे हे बंधूद्वय, सूर्याजी काकडे, बाजी पासलकर, येसाजी कंकासह जवळच्याच मुरुंबदेवाच्या डोंगरावर काट्याकुट्यांतून, दगडधोंड्यांना ठेचाळत, वेलींना हाताने दूर सारत सध्याच्या राजगडाच्या सुवेळा माचीच्या परिसरात येऊन दाखल झाले. तेव्हा त्यांना पालापाचोळ्यात आरामात विसावलेल्या श्रीगणेशाच्या मूर्तीचे दर्शन झाले. शिवबाराजेंनी तात्काळ मातीला दूर सारत मूर्तीला पाठीवरील तुंब्यातील पाण्याने स्वच्छ धुऊन काढली व खांद्यावरील उपरण्याने पुसून काढत त्या मूर्तीचे रानटी फुलांनी पूजन केले. त्यानंतर दिवसभर संपूर्ण परिसर पिंजून काढत सभोवतालचा अदमास घेतला. पूर्व, पश्चिम आणि उत्तरेस असलेले तीन डोंगर, त्यांच्या मधोमध असलेला उंटाच्या मदारीसारखा उंचवटा, आजूबाजूच्या घनदाट अरण्यात फक्त वारा आणि पाण्यालाच वाट मिळेल अशी ती रचना बघून राजे आनंदले. यावेळी हा डोंगर आदिलशाही मुलुखात होता आणि टेहेळणीसाठी एक-दोन ठिकाणी मेटच्यांवर मावळे तैनात होते. डोंगरधारेवरून कुणीही इथपावेतो सहज येऊ शकत होता. राजांनी अंदाज बांधला आणि इथे गड बांधून बंदोबस्तात राहण्याचे ठरविले (इ.स. १६४७). अशातच जवळच्या तोरणागडावर गुप्त धन सापडले. राजांना हुरूप आला. डोंगरधारांवर बुरुज, परकोटांचे घेर चढू लागले. सुरुवात गणेशाची मूर्ती सापडली तिथून झाली. योग्यवेळी गड बांधून काढण्याची बुद्धी श्रीगणेशाने दिली, म्हणून या माचीचे नांव राजांनी 'सुवेळा' असे ठेवले. या माचीत एक नैसर्गिक छिद्र (नेढे) आहे. ३ ते ४ कि.मी. लांबीच्या या माचीत दक्षिणेस येसाजी कंक, तानाजी मालुसरे यांचे वाडे, येसाजी कंक तलाव राजांनी इथे बांधून घेतले.

तिन्ही माच्या, बालेकिल्ला, परकोट आणि इतर बांधकामांना एकाच वेळी सुरुवात झाली. अशातच संजीवनी माचीत पाण्याचे टाके खोदण्यासाठी बारुद कामाचा स्फोट करतांना एक मजूर त्या स्फोटात चुकीने सापडला आणि गगनात दूरवर फेकला जाऊन काळ्या

कातळावर दाणकन् आपटला. तो गेलाच असे समजून इतर मजूर धावले, पण कसचे काय?..तो मजूर जणू काहीच झाले नाही अशा थाटात उठला. त्याला नवसंजीवन मिळाले; म्हणून ही 'संजीवन माची' म्हणून ओळखली जाऊ लागली. गड अभेद्य आणि अत्यंत सुरक्षित करण्यासाठी राजांनी या माचीत एकातएक अशा दोन तटबंद्या, मधल्या जागेत खंदक, चोर दरवाजे, पायऱ्या आणि चिरेबंदी बुरूज यांची रेलचेल करवून घेतली. परकोटाच्या बुरुजांना आणखी एक भिंत उभी करून मजबूत केले. या माचीवरील अळू दरवाजाने डोंगरधारेवरून तोरणागडास जाता येईल अशी सोय केली.

आता उत्तरेकडील माची म्हणजे पद्मावती माची. इथे राजरस्ता, राजवाडा, सदर, ढालकाठी, अंबरखाना, दिवाणघर, जिजाऊ मांसाहेबांचा वाडा, राणीवसा, राणीतलाव, सोनोपंत डबीरांचा वाडा, त्यास लागून त्यांची कचेरी, अधिकाऱ्यांची घरे, रामेश्वर व पद्मावती मंदिरे, पद्मावती तलाव, त्यास दोहों बाजूस दोन देखणी प्रवेशद्वारे, घोड्यांच्या पागा, बारूद कोठार इत्यादी अनेक वास्तू बांधून घेतल्या. या सोबतच आपात्कालीन स्थितीत बाहेर पडण्यास पद्मावती तलावाजवळच चोर दरवाजा तयार केला. गडाचे मुख्य प्रवेशद्वार म्हणजे पाली दरवाजा. तो अद्वितीय होण्यास याची रचना दोन टप्प्यांत केली. यास दोन दरवाजे उभारून खालच्यास बिनीचा, तर वरच्या दरवाजा 'म्यान दरवाजा' अशी नांवे दिली. पहिल्या दरवाजातून दुसऱ्या दरवाजाकडे येताना एका छोट्या दिंडी दरवाजातून परत पहिल्या दरवाजात येण्याची सोय करवून घेतली. तीन माच्या म्हणजे तीन स्वतंत्र किल्लेच आणि तेही सर्व पिण्याच्या पाण्यापासून ते लष्करीदृष्टचा स्वयंपूर्ण तयार झालेत, तेव्हा या प्रत्येकासाठी स्वतंत्र दरवाजे उभारण्याचा महाराजांनी हुकूम जारी केला.

बालेकिल्ला तर शुद्ध दगडच. तो अभेद्य राहावा म्हणून राजांनी त्यास पायऱ्या न ठेवता तीन पुरुष उंच असणाऱ्या त्या दगडात खोबणी करवून त्यांना मुठीत घट्ट धरून अंगावर भार घेऊन अन् शरीराचा तोल सांभाळत वानरासारखा पार करता येईल; अशी शक्कल लढवली. यातच भर म्हणून भव्य प्रवेशद्वार आणि त्याच्या संरक्षणार्थ षटकोनी बुरूज उभा केला. बालेकिल्ल्यात सदर, राजवाडा व इतर मोजक्याच इमारतींसोबत जननी देवी, चंद्रकोर नावाचे टाके व ब्रह्मेश्वराचे मंदिर उभारले. अशाप्रकारे स्वप्नातील अजिंक्य, दुर्गम पण देखण्या गडाचे मूर्त स्वरूप प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सुमारे दीड-दोन वर्षांचा कालावधी लागला. राजधानीस आवश्यक ते सारे बांधकाम गडावर झाले आणि हिंदवी स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचा मान राजगडास मिळाला. जवळपास दोन तपे म्हणजे १६४८ ते १६७० पर्यंत राजांनी या किल्ल्यावरून राज्यकारभार केला. मात्र, पश्चिम समुद्रावर वचक ठेवण्यासाठी आणि परकियांवर नजर ठेवून जलद हालचाली करता याव्यात याकरिता महाडजवळ राजांनी रायगड हा नवा किल्ला बांधून घेतला. आता हळूवारपणे राजगडावरील सामान रायगडाकडे जाऊ लागले. सुरुवात दफ्तरखाना हलविण्यापासून झाली. नंतर मांसाहेबांना युवराज संभाजीच्या देखरेखीत राजगडाच्या पायथ्याशी नव्यानेच वसवण्यात आलेल्या पाचाडच्या वाड्यात रवानगी करण्याचे ठरले. मांसाहेबांनी रायगडास जाण्याच्या आदल्या दिवशीची संध्याकाळ पद्मावती देवालयात पूजेअर्चेत घालवली. दुसऱ्या दिवशी पहाटेस निघायचे होते. त्यांच्या मनांत अनेक आठवणींचा काहूर माजला. याच गडावरून त्या अफझलखानाशी बोलणी करण्यास वाईला त्याच्या छावणीत गेल्या होत्या. शिवबांना आग्रा मुक्कामी कैद होताच कुलमुखत्यारीने त्यांनी न्यायनिवाडा केला आणि स्वराज्यास सांभाळले. रांगण्यास आदिलशाही सरदाराने वेढा दिला असता, किल्लेदारास कुमक पुरवून आदिलशाहीस माघार घेण्यास लावले तर पन्हाळ्यावर राजे अडकून पडले असता त्यांची सुटका

करण्यासाठी पदर खोचला. एवढे होऊनही अंतरीत शहाजीराजेंशी दोन तपानंतर झालेली ती भेट, तो वार्तालाप ठासून भरला होता. तो काही पिच्छा सोडत नव्हता. सदानकदा त्यातच त्या रमत होत्या.

वेळ रात्रीची होती. शहाजीराजे समाधानाने पलंगावर पहुडले होते. त्यांनी आपले डोळे मिटलेले होते. थोड्याच वेळात त्यांना कुणाची चाहूल तरी लागली. काही क्षणातच कुणी त्यांच्या पायाशी बसून त्यांचे पाय दाबू लागले. त्यासरशी चटका बसावा, तसे राजे पाय आक्रसून उठले. 'राणीसरकार!' त्यांच्या तोंडून आपसूक उच्चार बाहेर पडला. या जिजाऊच आहेत, हे पहिल्या चाहूलीतच त्यांनी ओळखले होते. जिजाऊंना त्याचेच मोठे आश्चर्य वाटले. त्या म्हणाल्या, 'महाराजसाहेबांनी इतक्या वर्षांनंतर चाहूलीवरून आम्हास ओळखले?... आमचा आम्हासच हेवा वाटतो.' शहाजीराजे यावर विचारपूर्वक बोलले, 'त्यागमय जीवन जगणाऱ्या तपस्यांचे तेज कुठूनही जाणवतेच. महाराणी! तुम्हास आम्हीच जास्त ओळखतो, म्हणूनच आम्ही आमचे पाय तुम्हास दाबू दिले नाहीत. दैवताच्या योग्यतेला पोहचलेल्यांनी माणसासारखे वागू नये. अशावेळी सेवा करणाऱ्यापेक्षा करून घेणाऱ्याला शरम वाटते.' जिजाऊसाहेब मृदू भावनेने म्हणाल्या, 'महाराज, हे काय बोलणे! अहो, मी आपली पत्नी आहे. आपणच सांगितलेले काम करीत राहिले. यात जे कांही आहे ते आपलेच आहे. महाराज, ही जिजाऊ धन्य आहे. स्वातंत्र्यात जगायचे तिचे स्वप्न पूर्ण झाले आहे. महाराज, हे सारे आपल्या आयुष्यभराच्या मेहनतीमुळे झाले. त्यामुळे पत्नी म्हणून नाही, तर आपण मला हवे ते स्वराज्य दिलेत म्हणून तरी आपली सेवा मला करू द्या.' शहाजीराजे ठामपणे म्हणाले, 'राणीसरकार! आजपासून आम्ही आपल्याला राजमाता म्हणत जाऊ, कारण आपण खरा राजा निर्मिला आहे. त्याकरता चोवीस वर्षे पतीविना राहण्याची तपश्चर्या आहे. त्यामुळे आम्ही आमची श्रेष्ठता मिरवणार नाही. आपल्या हाती शिवाजीराजे होते तर आमच्या हाती संभाजीराजे होते. आपण शिवाजीराजेंकडून राज्यनिर्मिती केलीत तर आम्ही संभाजीराजांना वाचवूही शकलो नाही. हाच आपल्यात आणि आमच्यात फरक आहे. आता तो आईविना पोर, आपला नातू संभाजीराजा याला वाढवा आणि शिवाजीसारखाच तयार करा. ही योग्यता फक्त आपली आहे. राजमाता जिजाऊसाहेब, पुढच्या पिढ्या 'आई' हा विषय निघताच आपले नांव सर्वप्रथम घेतील. आपण धन्य आहात!' जिजाऊसाहेबांनी आवेगाने शहाजीराजांचा हात आपल्या दोन्ही हातांनी पकडला आणि अनावर आवेगाने त्या हमसून हमसून रडू लागल्या. त्यांचे खांदे गदगद् हुंदक्यांनी हलत होते. शहाजीराजे या चोवीस वर्षांच्या वाहत्या एकांताकडे शांतपणे एकटक पहात राहिले.

कारभारी, सरदार, अधिकारी आदींची रायगडी रवानगी पूर्ण झाली. आता स्वतःच रायगडकडे निघण्याचे वेध शिवबांना लागले. अशाच स्थितीत राजगडाचा परिसर एकदाचा डोळ्यांखालून घालावा या उद्देशातून ते एके दिनी सुवेळा माचीच्या अंबारी बुरूजावर येऊन पोहोचले. सोबतच्या सुभानरावांना उद्देशून ते बोलले, 'सुभानराव, ही सुवेळा दीड कोसांची, तर संजीवनी दोन कोसांची. कधी आक्रमण झालेच तर या सुवेळेलाच त्याचा पहिला वार सहन करावा लागेल आणि हा अंबारी तो अंगावर घेत मदमस्त हत्तीसारखा लढवत ठेवेल. त्यामुळेच खालचा अखंड कातळ उघडा न ठेवता त्यावर आम्ही ही बुरूजाची अंबारी चढवली आहे.' पुढे घडलेही तसेच. दिल्लीपती मुघलांचा वेढा दिनांक २८ नोव्हेंबर १७०३ रोजी राजगडास पडला. सतत दोन महिने याच बुरूजावरून किल्लेदार संताजी शिळीमकर गड लढवत होते. मात्र ४ फेब्रुवारी १७०४ रोजी सकाळच्या प्रहरी गडाचे रक्षण करताना याच

अंबारी बुरूजावर तोफेच्या माऱ्यात ते ठार झाले. त्यांची समाधी याच परिसरात आहे. अखेर १६ फेब्रुवारी १७०४ ला मोगलांनी गड सर केला आणि औरंगजेबाने या गडाचे 'नबी शाहगड 'असे नवे नामकरण केले. आता सुवेळावरून राजे परत पद्मावती माचीकडे आले. प्रवेशद्वार ओलांडून सदरेवर पाय ठेवताच बाजूच्या खाली जाणाऱ्या पायऱ्यांकडे त्यांचे लक्ष गेले आणि मुकाटपणे खाली उतरू लागले. ती वाट होती १० फूट बाय १० फुटांच्या खलबतखान्याची. अनेक गुप्त खलबते याच ठिकाणी रचली गेली होती, पण सगळ्यांत आकर्षक होते ते पिताश्री शहाजीराजेंनी आणलेले खलबतशहाजीराजे आणि शिवाजीराजांची इथे झालेली भेट ही नुसती पिता-पुत्रांची भेट नव्हती, तर दक्षिणदेशीच्याच काय तर उभ्या हिंदुस्थानाच्या राजकारणाची दिशा ठरवणाऱ्या दोन महापुरुषांची भेट होती. जणू स्वातंत्र्याकांक्षी दोन शिखरे एकमेकीस भेटत होती. विषय तर अनेक होते. शिवाजीराजांचा प्रत्येक पराक्रम शहाजीराजांना शिवाजीराजांच्याच तोंडून ऐकायचा होता. दक्षिणेतील प्रत्येक राज्याची इत्थंभूत माहिती शिवाजीराजांना शहाजीराजांकडून हवी होती. साऱ्याच गोष्टींची देवाणघेवाण सुरू होती. पण त्याचबरोबर महत्त्वाचे राजकारण शहाजीराजांनी आणले होते, ते म्हणजे आदिलशाहीशी तह. शिवाजीराजांनी हे राजकारण पटकन् मंजूर केले. शिवाजीराजे म्हणाले, 'महाराजसाहेब, आपले राजकारण अतर्क्य आहे. आदिलशाही मुलुख आपण घेतला आणि त्यास औरंगजेबाने मान्यता दिली, हे सरळ दिसते. पण, आपण तर आदिलशाही मुलुखासाठी आदिलशाहीचीच मान्यता आणलीत.' शहाजीराजे हसले व म्हणाले, 'शिवबाराजे! याला आपला पराक्रम कारणीभूत आहे. मागे आमच्या पहिल्या अटकेतून सुटतांना कोंढाणा परत द्यायला लावला होता, तो सल आता निघाला.' शिवाजीराजे पटकन् हात जोडत म्हणाले, 'महाराजसाहेब! माफ करा. तेव्हा आम्ही अज्ञान होतो. त्यामुळे कोंढाणा देतेवेळी आम्हास वाईट वाटले, पण त्या ज्येष्ठ सोनोपंतांनी त्यावेळीच आमचे डोळे उघडले.' महाराज म्हणाले, 'शिवबाराजे, अहो, त्यासाठी नाही आम्ही बोललो. तेंव्हाही आपण बरोबरच होता आणि आजही बरोबर आहात. आम्हास जे संपूर्ण आयुष्यात शक्य झाले नाही, ते आपण केलेत. आता दक्षिण जिंकायला केव्हा येता? ते सांगा. शिवबाराजे! आता अर्धाअधिक दक्षिण आपल्याकडे आहे, पण आपल्याला सध्या शाहिस्तेखानाचा समाचार घेणे क्रमप्राप्त आहे. पावसाळाभर तो गप्प राहून हालचाल करील. त्याचे संकट हरले की आम्ही सांगू तेव्हा तुम्ही दक्षिण आघाडी उघडा. आम्ही आहोत तोवर झटकन् यश आहे, पण आमच्यामागे एकोजीरावांची बुद्धी कशी चालेल ते सांगता येत नाही. तेव्हा लक्षात ठेवा, आता आम्ही आदिलशाही प्रतिनिधी म्हणून आलो आहोत ते तह करण्यासाठी. वापस जाऊन कार्यपूर्ती करू आणि या शाहिस्तेखानासाठी वाटल्यास पुन्हा येऊ; आपले पिताजी म्हणून, स्वतंत्रपणे.' अशा रीतीने राजकारणाची दिशा ठरली. अंतरंगाचा कणनकन् समाधानाने भरुन घेत शहाजीराजे परत निघाले. शिवबाराजे आणि संपूर्ण राजकुटुंबाने वारणा नदीपर्यंत येऊन त्यांना निरोप दिला

तो दिवस राजांनी पद्मावती माचीवरील राजवाड्यात घालवला. दुसऱ्या दिवशी पहाटेस उठून त्यांनी आन्हीकं उरकून घेत राजगडावर देवदर्शन आटोपले आणि किल्लेदार सुभानरावांच्या खांद्यावर हात टाकीत राजे बोलू लागले,' 'सुभानराव, आम्ही असता गड सांभाळला तसा सांभाळा. आम्ही आहोत, असे समजून दक्षतेनं रहा. या गडानं जिवाची भारी गुंतवणूक केली आहे. अफझल भेटीला आम्ही येथूनच बाहेर पडलो, याच जागेवरून शाहिस्तेखानाला शास्त दिली, प्रतापगड भवानीचे दर्शन आम्हाला इथेच घडलं, मिर्झाराजांच्या भेटीला इथूनच आम्ही पाऊल टाकलं; आणि मांसाहेबांचं पुण्यदर्शन इथंच घडलं. सईबाई राणीसाहेबांचा मृत्यू आणि युवराज राजारामसाहेबांचा जन्म याच गडावर झालेला आम्ही

पाहिला आहे. या आणि अशा काही आठवणी आम्ही या जागेवर हरवल्या आहेत.' राजांच्या डोळ्यांत अश्रू गोळा झाले तसे उपस्थितही भावनाविवश झाले. त्याच अवस्थेत राजे पालखीत बसले आणि सारा गडपरिवार पालखीमागे राजवाडा, राजसदर, राजमार्ग करत पाली दरवाजातून खालच्या पाली गावाकडे मार्गस्थ झाला. (डिसेंबर १६७०).

आपण आता राजगडाचा पूर्वेतिहास जाणून घेऊ. इसवीसनाच्या पहिल्या शतकात या भागात सातवाहनांचे राज्य होते. त्याकाळी हा मुरुंबदेवाचा डोंगर म्हणून ओळखला जाई. 'बुऱ्हाण-ए-मासिर' या फारसी ग्रंथात निजामशाहीचा संस्थापक अहमद बहिरी याने इ.स. १४९० च्या सुमारास मुरुंबदेव गड जिंकला. इ.स. १६२५ मध्ये त्याचा ताबा आदिलशाहीकडे गेला तर १६३४ मध्ये निजामशहाने तो परत जिंकून घेतला. इ.स. १६४७ मध्ये मुरुंबदेव दुर्ग शिवबाराजेंनी ताब्यात घेऊन त्याचा जिर्णोद्धार केला आणि १६४८ मध्ये तिला हिंदवी स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचा मान दिला. इ.स. १६६५ मध्ये मुघलांनी राजगडावर आक्रमण केले; परंतु मराठ्यांनी गडावरून केलेल्या विलक्षण माऱ्यामुळे मुघलांना माघार घ्यावी लागली. संभाजीराजांच्या मृत्यूनंतर १६८९ मध्ये मुघल सरदार किशोर सिंग यांनी राजगड जिंकला, पण थोड्याच अवधीत मराठ्यांनी तो परत जिंकून घेतला. इ.स. १७०४ ते १७०७ च्या दरम्यान तो मुघलांच्या ताब्यात होता. २१ मे १७०७ रोजी मराठ्यांतर्फे गुणाजी सावंत व पंताजी शिवदेव यांनी राजगड जिंकला. सन १७०९ मध्ये राजगड शाहू महाराजांच्या ताब्यात आला. पुढे त्यांनी तो भोरच्या पंत सचिवांकडे दिला. सन १८१८ मध्ये ब्रिटिशांनी राजगडाचा भोर संस्थानाकडे असलेला ताबा कायम ठेवला.

एकंदरीत राजगड म्हणजे शिवबाराजेंच्या स्वप्नातील अजिंक्य, दुर्गम, पण देखण्या गडाचे महाराजांनीच साकारलेले मूर्त स्वरूप. शिवरायांचे सर्वस्व व्यापून टाकणारा हा गड आहे. खऱ्या अर्थाने 'राजगड हा गडांचा राजा अन् राजांचा गड' आहे. राजगडासारखा दुसरा किल्ला होणे नाही. गडमाथ्यावर सर्वोच्च स्थानी कमी जागेत बांधलेला बालेकिल्ल्याचा बुलंद दरवाजा, संजीवनी माचीची चिलखती रचना, सुवेळा माचीवरील अवाढव्य हत्तीप्रस्तर हे सगळंच अद्भुत, अतर्क्य वाटावे एवढं भव्यदिव्य आहे. या सगळ्याच बांधणीत राजांची दुर्गबांधणीतील कल्पकता दिसून येते. जगातील चौदा सर्वोत्कृष्ट किल्ल्यांच्या प्रतिकृती स्वित्झर्लंडमधील संग्रहालयात ठेवल्या आहेत. आपल्या सर्वांना अभिमानाची गोष्ट अशी की, त्या चौदा किल्ल्यांत आपल्या राजगडाचाही समावेश आहे. नुकताच युनेस्कोने राजगडाची जागतिक वारसास्थळ यादीत समावेश करून त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. विशेष म्हणचे, त्या आधीही राजांचा शत्रू औरंगजेबाचा एक अधिकारी साकी मुस्तैदखानाने 'राजगडाचा घेरा बारा कोसांचा असून, गड अतिशय उंच आहे. उंची बघता तो किल्ल्यात श्रेष्ठ होय, असे म्हणता येईल' अशी नोंद केलेली आहे. राजगडाच्या बालेकिल्ल्यावरून आजूबाजूस दिसणारे विहंगम दृश्य पाहतांना, स्वराज्याच्या ध्येयासाठी झटलेल्या आणि प्राणांची आहुती दिलेल्या असंख्य मावळ्यांचे आणि हिंदवी स्वराज्याचे सोनेरी स्वप्न अस्तित्वात उतरवणाऱ्या राजमाता जिजाबाई, छत्रपती शिवाजीमहाराजांचे स्मरण करतांना इथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात स्फुरण चढते. या स्फुरणातून आपणसुद्धा आपल्या समाजासाठी, देशासाठी जगासाठी, रंगल्या - गांजल्यांसाठी अन्यायाविरुद्ध काही योगदान केले पाहिजे असा विचार मनात येतो. तसे झाले तर राजगडासारख्या पवित्र मंदिरास भेट देणे सार्थकी ठरेल.

**- श्री. दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर, नागपूर-४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

# लोकमाता अहिल्याबाई होळकर - जीवन, कार्य, विचार आणि आजची प्रस्तुतता

*लोकमाता अहिल्याबाईंचे इतिहासातील स्थान फार उच्च कोटीचे आहे. त्यांची दूरदृष्टी, समाजाविषयीची तळमळ आणि त्यांची श्रद्धा ही आजच्या बहुतांशी सामाजिक कार्यकर्त्यांपेक्षा अढळ निष्ठेची होती हे सहजपणे दिसते. - संपादक*

*(मागील अंकाचा उर्वरीत भाग पुढीलप्रमाणे)*

'माई (अहिल्या) लढणार नाही, तह करील, खंडणी देईल.' अशा कल्पनेने राघोबा सैन्यासहीत माळव्याच्या दिशेने निघाला. माईचं गुप्तहेर खातं अतिशय कार्यक्षम या हालचालींचा सुगावा लगेच लागला. धन्यानेच (पेशव्यानेच) एका क्षुद्र नोकराच्या सल्ल्याने दौलत बुडवण्याचा प्रयत्न करावा याचा तिला मनस्वी संताप आला. सारी वैयक्तिक दु:खे बाजूला सारून धनीपणाच्या जरबेने ती कारभाऱ्यांना बोलली,

''मेल्या बामणानं हरामखोरी आरंभली आहे. परंतु मी बाई असे मानू नका म्हणावं. खांद्यावर भाला टाकून उभी राहीन तेव्हा श्रीमंताचे दौलतीस अवघड पडेल. आमचे वडिलांनी भांडभवई (खुषमस्करी) करून दौलत मिळविली नाही. तर तरवारीच्या अनुमाने शरीर खर्च घातले आहे. आम्ही सिलेदार वडिलांचे चाकरीप्रमाणे चाकरी घेतल्यास हजर आहोत. ऋणानुबंध सरली असल्यास मोगलांची अथवा फिरंग्याची चाकरी करू. अगर पाहिजे ते करू. पण ब्राह्मण म्हणतील दौलतीची अभिलाषा धरू तर ते होणार नाही.''

माई लगोलग तयारीला लागली. माळव्यात बातली पसरवली गेली. माईने राघोबाच्या विरोधात पाच हजार स्त्रियांची फौज तयार केली आहे. हेतू हाच की शत्रूचं मनोधैर्य खच्ची करावे. पाठोपाठ भोसले, गायकवाड, दाभाडे, शिंदे पवार साऱ्यांना ''दौलत संकटात आहे.'' अशा आशयाची पत्रे धाडली गेली. तुकोजीस निरोप गला, ''जेवीत असल्यास पाणी प्यावयास आम्हा-पाशी यावे. मंत्रभेद न होण्याविषयी फार जपावे.'' मल्हाररावांचे उपकार नि कीर्त आठवून साऱ्या सरदारांची सहानुभूती माईंकडे वळली. महादजी शिंदे व जानोजी भोसले राघोबाबरोबर वावरणारे पण या कामी त्यास सहकार्य देईनासे झाले. केवळ १५ दिवसांत फौज जमा झाली. माईने आपल्या लाडक्या हत्तीचा हौद तीक्ष्ण बाणांनी सज्ज ठेवला. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, पुण्याला जासूद पाठवून माधवराव पेशव्यांकडे दाद मागितली. त्या थोर, समंजस, न्यायनिष्ठूर पेशव्यांनी उलट टपाली पत्र पाठवले, ''तुमचे दौलतीविषयी जो पापबुद्धी ठेवील त्याचे पारिपत्य बेलाशक करावे.'' धन्याकडून असं पाठबळ मिळताच माईला जणू हत्तीचं बळ आलं. तिने राघोबाला चोख खलिता पाठवला. त्यात मोठा मार्मिक निरोप धाडला. ''आपण स्त्रीबरोबर युद्ध करू नका. जिंकलात तर मोठा पुरुषार्थ नाही. पण पराभव झाला तर, तुमचे हसे होईल.'' राघोबा चकित झाला. माईची लोकप्रियता, मान्यता, व रणनीती पाहून त्याला स्वत:चा पराभव दिसू लागला. त्याने समारोपाची बोलणी सुरू केली. ''पती, लेक आणि सुना गेल्या म्हणून आम्ही सांत्वनास येत आहोत.'' माईनं प्रतिउत्तर केलं, ''सांत्वनासाठी येताना इतकी सेना सोबत आणत नसतात. आलात तर एकटे या.'' राघोबा अक्षरश: दहा सैनिक सोबत घेऊन आला.

लढाईचे वातावरण विरून स्नेहाचे निर्माण झाले. बंदुकीची एकही गोळी न उडवता, म्यानातून तलवार न

उपसता, धनुष्याला बाण न लावता, केवळ धैर्याने आणि मुत्सद्देगिरीने माईने राघोबावर विजय मिळवला होता. मल्हाररावांच्या सुनेचा पाहुणचार, तिची लोकप्रियता आणि तिचे आदर्श जीवन बघून राघोबा खजिल झाला. तो परतल्यावर माईने सर्व पाठीराख्या सरदारांना भेटवस्तू देऊन त्यांना निरोप दिला. कृतज्ञता व्यक्त केली. सावधगिरी म्हणून गंगोबातात्यास कारभारातून दूर केले. तो पळून जातोय कळताच त्याच्या घरावर पहारे बसवले. आपण संन्यास घेतोय अशी त्याने युक्ती केली. 'अवश्य घ्या' म्हणत माईने त्यांना संन्याशाची वस्त्रे दिली. गौरव केला. नमस्कार केला आणि अगदी विचारपूर्वक त्याची व्यवस्था अडकाई किल्ल्यावर केली. न जाणे पुन्हा परत येऊन हा तात्या विरोधात उभा ठाकला तर? थोडक्यात, त्याला किल्ल्यावर कैदेत ठेवलं. माधवराव पेशव्यांनी ज्या गंगोबाला वेताच्या छडीने फोडून काढलं होतं. तो माईच्या कठोर न्यायासोबत किल्ल्यावर खंगून मरण पावला. या प्रसंगातील माईचे धैर्य, चातुर्य पाहून पेशवे, शिंदे, मोगल, निजाम साऱ्यांनाच अचंबा आणि अभिमान वाटला. माईच्या दृष्टीने लढणं गरजेचं नव्हतं, तर जिंकणं महत्त्वाचं होतं.

पुढे १७७२ च्या सुरुवातीस माधवराव पेशव्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे नारायणराव व काका रघुनाथराव यांच्यात मराठ्यांच्या गादीसाठी लढा झाला. राघोबा सत्ता सोडण्यास तयार नसल्याचे त्याने इंग्रजांकडून मदत मागितली. त्या बदल्यात एका करारानुसार सालसेट व वसई प्रांताचा काही भाग व सूरत आणि भरूच जिल्ह्यातील महसुलीचा अधिकार इंग्रजांना दिला. राघोबाचे हे कृत्य माईला मुळीच आवडले नाही. पुणे दरबारलाही राघोबाचा हा तह अमान्य होता व यातूनच १७८२ मध्ये पहिले मराठा-इंग्रज युद्ध उद्भवले. नाना फडणवीसांनी शिंदे-होळकर आदी फौजबंद सरदारांना मदतीसाठी बोलावले. पण महादजींनी मात्र उत्तरेसच राहणे पसंद केले. माईने त्यांचा धिक्कार केला. त्यांना राष्ट्रहीताची जाणीव करून देताना माई म्हणाली, ''इंग्रजांनी वसई घेतली. ते घाट चढतील तर देशात उपद्रव करतील. पुणे कसं राहील? मुख्य गादीच्या बळे आपण इथे थोर! पुणे आहे तर आपण आहोत. तुमचे जाण्याचे मानस नसेल तर आम्हीच येथून जाऊ. आम्हास जे होणे ते हो.'' माई खरोखरी सैन्य घेऊन पुण्यास गेली. नाचक्की टाळण्यासाठी महादजी व तुकोजी सैन्य घेऊन पुण्याच्या रस्त्याला लागले. मराठ्यांचा विजय झाला. राष्ट्राच्या विजयाचा आनंद तो आपला आनंद असं मानणाऱ्यांपैकी माई होती. तिचे राष्ट्रप्रेम उज्ज्वल व प्रखर होते.

सत्तेची लालसा राघोबाला स्वस्थ बसू देत नव्हती. राज्यलोभाने त्याने पुण्यात शनिवार वाड्यात गारद्यांच्या सहाय्याने नारायणरावांची भर दुपारी निर्घृण हत्या केली. मुगल राजवटीत शोभेल अशी घटना स्वराज्यात घडली. बातमी माईला कळली. राघोबाबद्दल आता तिला तिरस्कार वाटू लागला. बारभाईंनी राघोबास निष्कासीत केले. तो दारोदार फिरू लागला. होळकरांकडे मदत मागण्याचा त्याचा मानस होता. माईने लगेच बारभाईंना पाठिंबा दिला आणि कृष्णाजी मुरार याच्या नेतृत्वाखाली आपली फौज राबोघाचा प्रतिकार करण्यासाठी पाठवून दिली. राघोबाचे खुनी पाय महेश्वरास लागू नयेत म्हणून उलटा निरोप पाठवला.

''या प्रसंगी आपले येणे अप्रशस्त. आपण धनी. आपणांस प्रतिकूल कोण आहे? पण प्राप्त प्रसंगाची हवा पाहिली असता आम्ही मारले जाऊ. यास्तव आपणांस नर्मदा उतरणेस सल्ला नाही.''

मोठ्या चतुराईने माईने पेशव्यांच्या घरच्या भांडणात भाग घेतला नाही. उलट राघोबास आश्रय देण्यास नकार देऊन तिने पुणे दरबारची मर्जी राखली. यावरून मध्यवर्ती सत्तेबद्दल माईची निष्ठा अगदी स्पष्ट होते.

पण माईचा स्वभाव ''वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि'' असा होता. तिचं हळवं मातृह्रदय कायम मायेचा वर्षाव राघोबाची पत्नी आनंदीबाई गर्भवती होती. तिने पत्र लिहून माईकडे मदत मागितली. माईसमोर धर्मसंकट उभे राहिले. पेशव्यांच्या आज्ञेचे उल्लंघन करावे तर स्वामीनिष्ठेचा अनादर होईल आणि न करावे तर स्त्रीधर्म पाळला नाही हा बट्टा लागेल. विचारी माईने विचारपूर्वक निर्णय घेतला. इतिहासाने दखल घ्यावी असा सुवर्णमध्य माईने साधला. आनंदीबाईला महेश्वर अर्थात राजधानीला न बोलावता तिची मंडलेश्वमध्ये साडीचोळीची व्यवस्था केली. तिथेच तिची प्रसुती झाली. आनंदीबाईला घरात आश्रय न देताही माईने स्त्रीधर्म पाळला आणि पेशव्यांना पत्र लिहून सारी परिस्थिती कळूनही स्वामीनिष्ठाही सिद्ध केली. माईच्या या समयसूचकतेचे पेशव्यांनी कौतुक केले.

मराठेशाहीचे मूळ साताऱ्यास, तर बुंधा पुण्यास होता. त्या बुंध्याशी माईची अपार निष्ठा नी स्नेह होता. तेथील सारी मंडळी माईच्या कर्तृत्वाने आणि चारित्र्याने भारावून गेली होती. १७९३ मध्ये पेशव्यांचे वकील देवराव हिंगणे यांनी माईविषयी पेशवे दरबारी लिहिलेल्या मतावर हे सहज ध्यानी येते.

''मुख्य या दौलतीस अहिल्याबाईचे पुण्य, धर्म व बुद्धी, कायम मिजास, एकवचन व श्रीमंताचे चरणी निष्ठा व लौकिकावर दृष्टी, कर्तृत्व व पुरुषार्थ आहे.''

१७६६ मध्ये मल्हाररावांच्या मृत्यूनंतर मालेरावास गादीवर बसवल्यापासून वयाच्या ४१व्या वर्षी माई इंदूरच्या दौलतीची सत्ताधीश झाली. पुढची जवळ-जवळ २९ वर्षे म्हणजे १७९५ पर्यंत माळवा, इंदौर, माहेश्वर असा अफाट कारभार माईने सांभाळला.

एक कोटी रुपयांच्या उत्पन्नाचा मुलुख आणि खाजगी उत्पन्नाचे १६ लाख रुपये माईने तुळशीपत्र ठेवून ताब्यात घेतले. पूर्ण मालकी हक्क असलेल्या या दौलतीवर माईने कधीच मालकी दाखवली नाही. धार्मिक खर्चासाठी माई खाजगीचे उत्पन्न खर्च करी. माईची कारकीर्द शांतता व सुव्यवस्थेत गेली. चंद्रवतांच्या बंडाळीचा अपवाद सोडता कधीही लढाईची परिस्थिती उद्भवली नाही.

माईचा स्वभाव बाणेदार, काहीसा हेकेखोर, तापट असला तरी तिचे धोरण मात्र सर्वांशी सलोख्याचे असे. युद्धाच्या रक्तपाताचा तिला तिटकारा वाटत असला तरी प्रसंगी त्याचाही स्वीकार करण्यास ती तयार असे. दैनंदिन कामकाजात सल्लासमलतीसाठी पुरुष कारभारी दरबारात असत. पण माई सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून राहत नसे. माई स्वत: जातीने कारभार पाहत असे. तिच्या दक्ष व कडक वर्तनाचा साऱ्यांवर वचक असे. धर्म व न्याय, सत्य व नैतिकता तिच्या राज्यात नांदत असे म्हणून तिचा कारभार सत्ययुगाला साजेसाच होता.

माईच्या यशस्वी राज्यकारभाराचे गमक म्हणजे सर्व राज्यांशी तिने राखलेला स्नेहबंध ! हैदराबाद, श्रीरंगपट्टण, नागपूर, लखनौ, कलकत्ता, ग्वाल्हेर, पुणे येथील दरबारचे वकील माईच्या दरबारी होते; तर उदेपूर, जयपूर, हैदराबाद, अयोध्या, ग्वाल्हेर, पुणे, नागपूर, लखनौ, भोपाळ, दिल्ली इ. ठिकाणी तिने आपले वकील नेमले होते.

माईने पूर्वापार चालत आलेल्या अनेक कायद्यांत सुधारणा केली. करपद्धती सौम्य केली. उत्पन्ननुसार शेतसारा वसूल केला गेला. पाटील, कुलकर्ण्यांचे हक्क रक्षिले गेले. गावोगावी न्याय देणारे पंचाधिकारी नेमण्यात आले. एकदा काही धनगर बांधव माईच्या भेटीला आले. म्हणाले, ''मातुश्री आपलंच राज्य आहे. आमच्या जमिनींवरचा महसूल रद्द करा. आमचा ७/१२ कोरा करा.'' जातीबांधवांबद्दल माईला नक्कीच कणव होती. पण न्याय सर्वांना सारखाच हवा. म्हणून माई म्हणाली,

''ते जमणार नाही. तुमच्या जमिनींचा पोत बघून महसूल आकारला आली.'' माईच्या दप्तरी पडीक, जिरायती, बागायती इ. सर्व नोंदी सापडतात.

त्या दिवसात डोंगराळ भागात भिल्ल व गौंड लोक प्रजेला वारंवार उपद्रव करीत. त्या भागांतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून ते जबरदस्तीने 'भिलकवडी' नावाचा कर वसूल करी. माईन त्यांच्या प्रमुखांना बोलावलं. याबाबत विचारणा केली. उत्तर आलं, ''आम्ही तो मुलुख राखतो. आमचा हक्क आहे त्यावर. भिलकवडी आमची रोजी रोटी आहे.'' माईने त्यांचा हक्क मान्य केला. त्यांचा स्नेह संपादन केला. म्हणाली, ''सगळा मुलूख तुमच्या ताब्यात देते, पण करावरचा कर तिजोरीत जमा व्हायला हवा. लक्षात ठेवा पराक्रम असावा पण तो राष्ट्राच्या उन्नतीसाठी. भक्षक नाही तर रक्षक बना.'' माईने त्यांच्याकडून पडीक जमिनींची लागवड करून घेतली. रोजगाराचं साधन उपलब्ध करून दिलं. त्यांना नेमून दिलेल्या प्रदेशात चोरी झाली तर त्या तपासाची जबाबदारी त्यांच्यावरच सोपवून मोठ्या चातुर्याने चोरांच्या तपासाचे कार्य चोरांवरच सोपवले. थोडक्यात, 'युक्तिने राज्य होतसे' हे सिद्ध केले. हे मान्य न करणाऱ्या मनरूप सिंगासारख्या डाकूस प्रसंगी कडक धोरण अवलंबून देहान्ताची शिक्षाही फर्मावली. सोबत माईने आणखी एक महत्त्वाची परंपरा मोडली, 'पडद्याची', जी स्वत: कधीही पाळली नाही. माई प्रजेसाठी सहज सुलभ होती. प्रजा सहजपणे तिच्याशी संपर्क साधू शकेल अशा ठिकाणी रोज सभा भरत असे. या साऱ्यासोबत दत्तक वारसास राजमान्यता, स्त्री सक्षमीकरण, पर्यावरण रक्षण आदी विषयक अनेक कायदे व नियम माईने प्रत्यक्ष अंमलात आणले.

दरम्यान माईला फौजेचे महत्त्व कळत नव्हते, तिने फौजेकडे दुर्लक्ष केले अशी एक वदंता उठली होती. पण त्यातही फारसे तथ्य वाटत नाही. फौज आणि संरक्षणाची जबाबदारी माईने तुकोजीवर सोपवली होती. माईपाशी स्वत:ची थोडी शिबंदी होती. त्या जोरावरच माईने स्वत: रामपुऱ्याचे बंड मोडलं. तुकोजी दूर मोहिमेवर असताना चंद्रवतांची बंडाळी मोडण्यास गेलेल्या अंबाजीपंतांना जेव्हा राजपूतांनी जीवे मारले तेव्हा पेंढारी फौजेनिशी (राजकीय आश्रयाला असणारी सशस्त्र लुटारुंची टोळी) शरीफभाईला चाल करण्यास माईने पाठवले. पराभव जिव्हारी लागलेली ही वाघीण फौजेला पाठवताना म्हणाली, ''मेले हो माघारी तोंड दाखवायला आला तर मेखूस (धातूची टोकदार खुंटी) घालून मारून टाकीन. मेवाड होते की नव्हते असे करून टाका.'' सैन्याचं मनोधैर्य कसं वाढवायचं, त्यांत वीरश्रीचा संचार कसा करायचा हे माईस पक्के ठाऊक होते. परिणाम चंद्रवतांवर विजय मिळाला.

पुण्याला बातमी जाताच तोफा उडवून प्रशंसोद्गार निघाले, ''शापादपि शरादपि असे बायकांत अहिल्याबाई दिसण्यात आली. आजपावेतो स्नानसंध्या कर्माची प्रवृत्ती ऐकण्यात येत होती. आज पराक्रमाची गोष्टही मोठीच केली. ब्राह्मतेज व क्षात्रतेज दोन्ही पाहावयास मिळाले. पुण्याचा दरवाजा म्हणजे माहिष्मती नर्मदा तीरचे हे आज आम्हास समजले.''

राज्यात शांतता व सुव्यवस्था नांदण्यासाठी माईने फौजेचा किती योग्य रीतीने वापर करून घेतला होता हे पुढील घटनांवर सहज लक्षात येईल. १७८० मध्ये राघोबाचा कारकून रामजीबापू विरुद्ध, १७८३ मध्ये रामपूरवाले मवासाने केलेल्या बंडाळी विरुद्ध, १७८५ मध्ये खांडवे परगण्यांतील मंडलोई विरुद्ध, १७९५ मध्ये शहरातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी माईने फोजेचा सुनियोजित वापर करून घेतला. तसेच १७८३ मध्ये महादजींनी ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला तेव्हा तीन तोफा उडवून माईने आनंद व्यक्त केला. फौजेचे कौतुक आणि त्यांच्या कर्तृत्वाचा योग्य सन्मान राजाचे

कर्तव्य असते याची माईस पुरेपूर जाणीव होती.

सैन्याच्या महत्त्वासोबत युद्धनीतीही माईस अवगत होती. टिपू सुलतानशी झालेल्या लढाईच्या प्रसंगी माईनी युद्ध विषयक तुकोबाला जो सल्ला दिला त्यावरून माईची सुज्ञता दिसून येते. वैयक्तिक पातळीवर दोघांचे कितीही मतभेद असले तरी दौलतीच्या प्रतिष्ठेसाठी माई त्याच्या पाठीशी उभ्या राहत. २१ नोव्हेंबर १७८७ रोजी लिहिलेल्या पत्रात त्या तुकोजीस लिहितात, ''टिपूचे करणे कृत्रिम फार आहे. तुम्हाकडे कागदपत्र पाठवित जाईल. त्यास तुम्ही बहुत सावध असावे. फंदफितुरी कोणाचे ऐकत न जावा. तुम्हास बदनाम करणाऱ्यास दूर ठेवावे.''

मतभेद असताना स्वकीय सोडाच; माई शत्रूंकडूनही आपले काम करून घेत असे. पेशवे होळकर निजामाशी लढत असताना हैद्राबादहून पुढे १२० कि.मी. अंतरावरील काही माणसे माईला भेटायला आली. तेथील पुरातन शिवमंदिराच्या जीर्णोद्धाराची मागणी करायला. माईने लागलीच निजामाला पत्र लिहिले, ''शिवाची पूजा हे आमचे आद्य कर्तव्य ! जनतेला या आराध्याच्या दर्शनाचा लाभ व्हावा ही इच्छा. इथून पैसे पाठवतेय. त्यांना काम करण्याची परवानगी द्यावी.''

इतक्या आत होळकरांची आपल्यावर नजर पडली तर जास्त दिवस आपल्याला इथे राहता येणार नाही हा धोका ओळखून निजाम प्रतिउत्तर करतो, ''आप हमारी बडी आपा है । ये सारा काम मैं अपने खर्चे से करुंगा।'' थोडक्यात, पैसेही पाठवू नका आणि आपणही इथे येऊ नका! असा तो निरोप होता. १८ व्या शतकात एकाही पुरुषाचे पाठबळ नसलेल्या स्त्रीचा शत्रूंवर इतका धाक होता.

माईचा कार्यविस्तार उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत विस्तारला होता. स्वत:च्या प्रदेशात ठीक आहे पण ३०० वर्षांपूर्वी दुसऱ्यांच्या प्रदेशात जाऊन आपलं काम करून घेणं राजकीय व भौगोलिक पार्श्वभूमीवर केवळ अशक्य होतं. पण माईने हेही सहज साध्य केलं. एक गोष्ट इथे लक्षात घ्यायला हवी, केवळ धार्मिक कार्याच्या जोरावर वा त्या पुण्याईवर निदान राजकारणात तरी कोणी कोणाचा सन्मान करणार नाही. पण संपूर्ण भारतवर्ष तेव्हा जाणून होतं की, माई फक्त शासन करीत नाही तर इतर शासकांवरही तिची सत्ता चालते. आणि म्हणूनच परप्रांतात माईचे काम सुरू असताना जर स्थानिक विरोध झालाच तर तिथली प्रजा आपल्या शासनकर्त्याच्या विरोधात उभी राहत असे. इतकी जनमान्यता माईला लाभली होती.

माईच्या या राजकारणाला वा राज्यकारभाराला धार्मिक जीवनामुळे एक प्रकारचे नैतिक अधिष्ठान लाभले होते. राजकारण पदरात पडले नसते तर ती कदाचित एखादी ब्रह्मवादिनी, संत किंवा पंडिता झाली असती. म्हणून तिने जनतेतच जनार्दन पाहून त्याच्या सेवेचे व्रत अंगीकारले. शैव पंथातील घराण्यातील भक्तिचा वारसा व संस्कारक्षम परोपकारी उदार व समृद्ध मनाच्या माईला सत्ता व संपत्ती हाती येताच इतरांच्या समृद्धीचा वेध लागला.

त्यामुळेच आजही माईचे नाव 'आसेतू हिमाचल' घेतले जाते. माईने बांधलेल्या देवळांमुळे, जीर्णोद्धारांमुळे घाटांमुळे, धर्मशाळांमुळे, विहिरींमुळे, अभयारण्यांमुळे, पाणपोयांमुळे अन्नछत्रांमुळे म्हणावेसे वाटते.

जिथे जिथे क्षेत्र आणि तीर्थ
तिथे तिथे स्मृती आणि कीर्त....

माई शिवाची भक्त असल्यामुळे तिच्या औदार्याचा अभिषेक प्रथम बारा ज्योतिर्लिंगावर झाला. नंतर द्रव्यकृपेचा झरा सप्तपुऱ्यांकडे (अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांची, अवंतिका, द्वारका) आणि चारही

धामांकडे (बद्रिनारायण, द्वारका, रामेश्वर, जगन्नाथ) इथे वळला. पंढरपूर, कोल्हापूर, नाशिक, जेजूरी, वेरुळ, चिंचवड, ओझर, वाफगाव, राजापूर, चौंडी, (बीड), संगमनेर, पुणे, निमगाव, पुणतांबे, ओझर, रावेर इ. पवित्रस्थळी माईच्या सत्कृत्याच्या स्मृतिशलाका आजही पहावयास मिळतात. या सर्व कामात अप्रत्यक्षपणे शेकडो कारागीर पोटापाण्याला लागले. कारागिरांबद्दल माईला अतिशय आदर. साड्या विणणारे खास विणकर बाहेरून बोलावून माईने त्यांना महेश्वरास बस्तान टाकून दिले. आज त्याच महेश्वरी साड्या भारतभर प्रसिद्ध आहेत. माईने शिल्पकलेलाही प्रोत्साहन दिले. यात्रेसाठी नवीन रस्ते बांधले. महेश्वराला अनेक देवळे व घाट बांधून त्याचा महिमा वाढवला.

माईच्या परोपकाराची पाखर पशुपक्ष्यांनाही लाभली. जंगलात राहणाऱ्या वन्यश्वापदांना त्यांचे खाद्य देण्याची सोय माईने केली. नभातील पक्षी व पाण्यातील मासे यांना कणकेच्या गोळ्याच्या रूपाने अन्न दिले. श्रावण महिन्यात माशांचा प्रजननकाळ लक्षात घेऊन कणकेची शिवलिंगे नर्मदेत विसर्जित करण्यास सांगून माईने पर्यावरण रक्षणाचा एक आदर्श घालून दिला. पशुपक्ष्यांच्या चाऱ्याकरिता माईने शेते राखून ठेवली. उन्हात शेतीची नांगरट करीत राबणाऱ्या बैलांना पाणी देण्यासाठी माईचे नोकर घागरी व बादल्या (पखाली) घेऊन हिंडत असत.

मुलगा, आई, वडील, सासू, सासरे, नणंदा या साऱ्यांच्या जाण्याने एकट्या पडलेल्या माईचा जीव रमत असे तो नातू नाथबामध्ये! पण त्याच्याही अकाली मृत्यूने माईचा एकप्रकारे निर्वंश झाला. मृत्यूने जणू माईसोबत उभा दावा मांडला. गंगेप्रमाणे निर्मळ जीवन असतानाही देवाने कुटुंबसुखाची चतकोर भाकरीही माईच्या पदरात टाकली नाही. लगोलग जावई यशवंतराव फणसेंना कॉलराने देवाज्ञा झाली. लेक मुक्ता सती गेली. दोन्ही भाऊ शहाजी व महादजी माईच्या हयातीतच वारले.

व्रतस्थ जीवन, पांढरा पोषाख, एकादशीचे मौन, पुराण-प्रवचन श्रवण, ब्राह्मणांसोबत गरीबांचाही नित्यपरमर्श, अन्नदान, वस्त्रवाटप किती पैलू व क्षेत्रं सांगावीत माईच्या कार्यक्षेत्राची! माईला देव, ब्राह्मण व गाय या तीन गोष्टी आत्यंतिक प्रिय होत्या. माई धर्मभोळी होती पण अज्ञ नव्हती. तिच्या सर्व धर्मकृत्यांस खाजगीचा दिवाण गोविंदपंत गानू आणि सुभेदारापासूनचा घरचा कारभारी भारमलदादा यांची मनोभावे मदत असे.

माईच्या धार्मिकतेचा हेतू जनकल्याण हाच होता. केवळ व्यक्तिगत मोक्ष असा संकुचित हेतू असता तर राजसंन्यास घेऊन ती कधीही काशीला जाण्यास मोकळी होती. पण तसे न करता प्राप्त कर्तव्य सांभाळून देवाधर्माची सेवा केली यात तिचे मोठेपण आहे. तिच्या या मोठेपणाभोवती अवतारित्वाचे वलय समकालिकांना दिसत असे. म्हणून 'गंगाजळ निर्मळ मातु:श्री' असे ते संबोधित असत. देवी व पुण्यश्लोक ही विशेषणे नंतर रूढ झाली.

माईने वैधव्यानंतर शरीराचे कोणत्याही प्रकारे लाड केले नाहीत. चोचले पुरवले नाहीत. साधा, सात्विक, शाकाहारी आहार. दैनंदिन जीवनाला सोज्वळ वळण, निर्मळ आचरण, नियमबद्ध व कडक उपासतपास, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा, यात्रा, दानधर्म इ. गोष्टी माईला आहार, निद्रेइतक्याच महत्त्वाच्या वाटायचा. म्हणूनच तिच्या नावाच्या केवळ उच्चाराने चार वेद, अठरा पुराणे, सर्व आरण्यके, सर्व तीर्थांच्या दर्शनाचा लाभ होतो अशी त्यावेळी मान्यता होती. थोडक्यात, पवित्र मंत्राइतके जिचे नाव शुद्ध आहे अशी पुण्यश्लोक म्हणजे अहिल्या मातु:श्री अशी उपाधी कुणी राजानेनाही तर भक्ति-मार्गावरील सर्व संतांनी माईला एकमुखाने दिली होती.

राज्यकर्ता म्हटलं की स्तुतीपाठक आलेच; पण माई या नियमालाही अपवाद होती. शास्त्रीबुवा, मोरोपंत यांनी माईवर स्तुतीपर कवने लिहिली. त्याचा योग्य

मोबदलाही माईने त्यांना दिला. आणि म्हणाली, ''फक्त परमेश्वरच स्तुतीस पात्र आहे. मानवाने मानवाची स्तुती करू नये. आपण माझ्यासारख्या दीन, पामराची व्यर्थ स्तुती केलीत. परमेश्वराची स्तुती केली असती तर त्या काळाचा सद्व्यय होता व पुण्यही लाभले असते.''

पुढे सवाई माधवरावांनाही राज्यकार्यकुशलतेचा आदर्श सर्वांसमोर रहावा म्हणून माईची एक तसबीर शनिवारवाड्यात असावी असे वाटू लागले. त्यानुसार एक चित्रकार त्यांनी महेश्वरास धाडला. त्याचा मनसुबा माईला कळताच त्याला स्पष्ट नकार देत लीनतेची मूर्ती म्हणाली, ''तसबीर देवादिकांची काढावी, मनुष्याची नाही.'' या असामान्य राज्यकर्तीला आत्मस्तुती अजिबात आवडत नसे. बहुतेकांचा असा समज होत असेल की, ही माई सारा वेळ देवाधर्माच्या कार्यासाठी खर्च करत असेल; पण इतिहास साक्ष आहे की, माईने आपल्या प्रशासकीय कौशल्याने व न्यायप्रियतेने होळकर राज्याला उंचीवर नेले.

माई धर्मासाठी जगली आणि धर्मासाठीच मेली. माईचं निधनही एकंदर धर्माचरणाला साजेल अशाच परिस्थितीत झालं. पती, मुलगा, सुना, मुलगी, जावई, सासू, सासरे, आई, वडील, भाऊ, नातू, नातसूना सारे मायापाश नियतीने तिच्यापासून हिरावून नेले. ७० वर्षे चंदनाप्रमाणे झिजलेलं शरीर या आघाताने अखेरच्या दिवसांत अधिक श्रमलं, दु:खी, उदास झालं.

मुलाच्या निधनाने दु:खी झालेली माई शांत होण्यासाठी दूरवर नर्मदेच्या काठी आली. तिथे तिला शिवाचं निवासस्थान महेश्वर गवसलं. त्यालाच राजधानी बनवलं. आणि आता ती इथेच कायमची शांत होणार होती. माईचा राजवाडा म्हणजे मोठं घर, अगदी साधं, मंदिरासारखं पवित्र, माईचं सिंहासन म्हणजे रेशमी छत असलेली एक साधी, कमी उंचीची लाकडी खुर्ची. त्या आसनावर सुद्धा पांढरी घोंगडी. षड्रिपूंचा वारा जराही अंगाला लागू न देणारी, श्रीमंतीचा तिटकारा असणारी, आसक्तीतील विरक्तीचं मूर्तीमंत प्रतिक असणारी माई!

१३ ऑगस्ट १७९५ श्रावण वद्य चतुर्दशी. अवतारसमाजी पूर्वी सावधपणे १३ हजार पात्र जेवणाचा संकल्प माईने सोडला. आसन्नकाळी मोक्षधेनूंचे दान दिले. सर्वांवर मायेचा कृपाकटाक्ष टाकून या स्वाध्वीने जगाचा कायमचा निरोप घेतला. वाड्यात 'दर्शनी' गाय होती. माईच्या निधनाची जाणीव होताच तिने, त्या मुक्या जनावराने हंबरून हंबरून प्राण सोडला.

ही आख्यायिका आहे असे मानले तरी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, व्यक्ती लोकोत्तर असल्याशिवाय अशा आख्यायिका पिकत नाहीत. कडक धर्माचरणामुळे पावित्र्यात व सात्विकतेचे एक वलय स्वत:भोवती निर्माण झालेल्या माईने त्याग आणि नि:स्पृहतेचा आदर्श जगापुढे निर्माण केला.

इस्ट इंडिया कंपनीचे प्रशासक आणि इतिहासकार सर जॉन मैल्कम लिहितात – ''बाईचे चरित्र अलौकिक आहे. तिच्यात अहंकाराची भावना मुळीच नाही. विलक्षण धर्मवेडाबरोबर तिच्यात फार मोठी परधर्मसहिष्णूता आहे. आपल्या अधिकाराचा उपयोग ती फारच दक्षतेने व काळीपूर्वक करते. आपल्या सद्सद्विवेक बुद्धिचे आदेश ती कसोशीने पाळते. स्वत: कडक आचरण ठेवूनही इतरांच्या दोषांबद्दल क्षमावृत्तीची तिची धारणा असते.'' म्हणूनच इतकं आदर्शवत जीवन जगणाऱ्या माईशी वैर करणं त्याकाळी महान पाप समजले जाई. हिंदूप्रमाणे मुसलमानही तिला दीर्घायू व सुयश प्राप्त व्हावे म्हणून प्रार्थना करीत!

थोर पेशवा माधवराव, मंत्र्युत्तम नाना फडणीस, हरिपंत तात्या फडके, मुत्सद्दी वीर महादजी शिंदे, पंडित कवींचे मेरुमणी मोरोपंत, शाहीर अनंतफंदी, देवराव

हिंगण्यांसारके दरबारी वकील, इंग्रज सेनानी व कारभारी साऱ्यांनी माईची कारकीर्द अनुभवली. या सर्व समकालीन थोर मंडळींनी माईची मुक्तकंठाने प्रशंसा केली. यातच माईची थोरवी लक्षात येते.

एकीकडे इंग्रजांचा प्रवेश, मुघल साम्राज्याला लागलेली उतरती कळा, छोट्या-छोट्या वतनदारांची अस्तित्वासाठी चाललेली धडपड, सतत युद्धजन्य परिस्थिती, अशा अस्थिर वातावरणात म्हणजेच १८ व्या शतकाच्या मध्यकाळात सनातन भारताच्या सभ्यतेचे एकमेव आदर्श उदाहरण साऱ्या जगाला पहायला मिळाले. एका कर्तृत्ववान सासऱ्याने आपल्या सुनेला मुलगी मानून तिला शिकवले, तिला समर्थ बनवले आणि नि:शंकपणे राज्य तिच्या हाती दिले. युरोपियन संस्कृतीने दुसऱ्या महायुद्धानंतर स्त्रीयांचे अधिकार मान्य केले. पण भारताने 'यत्र नार्यस्तू पूजन्ते, रमन्ते तत्र देवता' या आपल्या सनातन विचारधारेला कायम शीरोधार्य मानले.

याचं फलित म्हणजे आज अनेक हिंदूंना जे कळत नाही ते १७६० मध्येच माईला कळलं होतं! या भारताच्या नाभीस्थानी 'रामराज्य' निर्माण करण्याचा प्रयोग या द्रष्ट्या स्त्रीने केला. तिच्या पुण्याईची वाट विनासायास एकंदरच मराठ्यांच्या कीर्तीवैभवाला कारणीभूत होत आहे. याचा खचितच संतोष व अभिमान आहे.

आजपासून सुमारे २६० वर्षांपूर्वी १ कोटी १६ लाख रुपये ताब्यात असणाऱ्या या माउलीला त्याचा यत्किंचतही लोभ वाटला नाही, की मनात लालसा उत्पन्न झाली नाही. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत केवळ ५० रु.साठी मित्राचा खून करणारे तरुण पाहिले की, माईच्या महानतेची व तिच्या आध्यात्मिक बैठकीची उंची लक्षात येते. राणीपदावर असूनही दासीसारखे सामान्य जीवन जगणाऱ्या माईने 'इदं न मम्' या चिरंतन सत्याला स्वीकारत विरक्तीचा एक आदर्श वस्तूपाठ जगासमोर ठेवला.

नारीशक्तिचा आदर्श, जनहीतकारी शासन, धार्मिक सहिष्णूता, व सर्वसमावेशकता, विकासासाठी लोकसहभाग त्यायोगे रोजगार निर्मिती, शाश्वत विकासाचे तत्त्वज्ञान माईंच्या जीवनातील हे आदर्श गुणविशेष आजही मार्गदर्शक व अनुकरणीय असेच आहेत.

माईच्या कार्याने प्रभावित झालेली इंग्रज रेसिडेंटची पत्नी Mrs. जोना बेली लिहिते -

There stops the traveller a while,
And eyes it with mournful smile,
With muttering lips, that seem to say
This was the works of Ahalya Baee
Kind was her heart, bright her fame
And Ahalya was her honoured name...

वाळवंटाप्रमाणे रखरखणाऱ्या आयुष्यात कौटुंबिक सुखाची झुळूकही वाट्याला न आलेल्या माईच्या कार्याने कस्तुरीप्रमाणे तिच्या सत्कीर्तीने श्रद्धाळू जगाला मोहिनी घातली. कौटुंबिक आपत्तींच्या अखंड वादळातसुद्धा स्वधर्म न सोडलेली, स्त्रीत्वाच्या मर्यादा व अंतर्गत शत्रूंच्या कारवाया अशा दुहेरी प्रतिकूल परिस्थितीत धार्मिक बाबतीत कर्णाचे औदार्य दाखवणारी, राजकारणात शिवरायांचा समजूतदारपणा राखणारी अहिल्यामाई मातोश्री म्हणूनच पुराणातील अहिल्येपेक्षा जास्त जवळची वाटते, जास्त थोर वाटते!

इतिहासकाली स्त्रिया आजच्यासारख्या स्वतंत्र नव्हत्या. त्यांच्या विकासाला व कर्तृत्वाला फारसा वाव नव्हता. पण अशाही परिस्थितीमध्ये अहिल्यामाई पुरुषांच्या बरोबरीने चमकून गेली. प्रतिकूल परिस्थितीत कीर्ती करून गेली. आता गरज आहे ती माईच्या जीवन

(पृष्ठ क्र. १८ वर)

# कवितेचा आकृतीबंध

*काव्य लेखनात आकृतीबंधाची गरज असते. काव्यातील नितांत सुंदर बारकाव्यांचे परीक्षण करणारा डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

कोणत्याही साहित्यकृतीला 'फॉर्म' असतो. कविता असो नाहीतर कादंबरी. साहित्यकृतीमध्ये फॉर्म असतोच. तो कधी शैलीच्या, कधी शब्दांच्या, कधी मांडणीच्या, कधी आशयाच्या पातळीवर असतो. लेखकाला फॉर्म माहिती असावाच लागतो. लेखक/कवीला त्यांनी सर्जनासाठी हाती घेतलेल्या साहित्यकृतीचा फॉर्म नीटपणे माहिती असला पाहिजे. फॉर्म माहिती असेल आणि धडपणे हाताळता येत असेल तर फॉर्मला ओलांडता येतं, त्याच्यावर प्रयोग करता येतात. अनेक दर्जेदार कवी/लेखक फॉर्म स्वीकारत नाहीत, कारण त्यांचा कसदार आशयच फॉर्म घेऊन अवतरतो. लेखक म्हणून तुम्ही फॉर्म नाकारत असाल तर तुमच्याकडे त्याचं विवेकनिष्ठ विश्लेषण असलं पाहिजे. याचा अर्थ तुम्हाला फॉर्म कळतो; पण एकतर तुम्हाला फॉर्मवर प्रयोग करायचाय किंवा तुमच्या आशयाला निराळा फॉर्म हवा आहे किंवा तुम्हाला फॉर्मच नको आहे? कारण तुम्हाला नवा फॉर्म जन्माला घालायचाय. पण लेखक/कवीला हे कळलं पाहिजे. नाहीतर तुम्ही प्रोजेक्टेड लेखक होता. अशा वेळी ना तुमचा आशय खोल असतो, ना फॉर्म प्रयोगशील असतो.




**देठाचे स्वातंत्र्य- धामणस्कर**

फुलाला स्वातंत्र्य आहे कुणाच्याही
ओंजळीत झोकून द्यायचे स्वतःला
मानायचे मनोमन की
देठाशी आपला संबंधच नव्हता..
देठाचे स्वातंत्र्य एवढेच की
वेदनेतही चेहरा
आत्म्यासारखा निर्लेप ठेवायचा;
फुलाची कुणी चौकशी केली तर म्हणायचे,
"छे, छे. मी नुसता देठच;
पलिकडच्या
फूल असलेल्या देठांना विचारा.."

- धामणस्कर

लेखक वाचक घडवतो तसा वाचकही लेखकाला घडवत असतो. इथे वाचकाने लेखकाला सतत प्रश्न विचारले पाहिजेत, अधिकाधिक सकस निर्मितीचा आग्रह धरला पाहिजे. परिष्कृत वाचक म्हणून समीक्षकाने तर हे करायलाच हवं. समीक्षक नुसता विवेचक किंवा चिकित्सक नसतो तर वाटाड्याही असतो. त्याने/तिने साहित्यकृतीचं विश्लेषण तर करावंच, पण लेखकांना आशय आणि फॉर्मविषयी सज्ञान करावं. अन्यथा फुटकळ आणि आवाजी आशय कोणत्याही फॉर्मशिवाय फक्त शब्दांमधून कोसळत राहतो. वाचकांना समृद्ध करण्याऐवजी त्यांच्या संवेदना सुमार करत राहतो. कंपू तयार करून लेखक मोठा होईल पण त्यामुळे साहित्य खुजं होत जाईल त्याचं काय? सद्यस्थिती तर अशी दिसतेयं की, कसदार लेखन फार प्रकाशात नाही आणि सुमार लेखन सर्वत्र वावरतंय. आपण कंपू करून कशालाही भारी म्हणणार असू तर एकतर ते आपल्या करंटेपणाचं लक्षण आहे आणि दुसरं म्हणजे साहित्यनिर्मितीसाठी मारक आहे. समीक्षकाने कशाचाही

मुलाहिजा न ठेवता, निर्भिडपणे चिकित्सा करून हिणकस कसं अधिक दर्जेदार होईल आणि दर्जेदार असलेलं कसं सर्वांपर्यंत पोहचेल हे बघायला हवं.

'देठाचे स्वातंत्र्य' नावाची द. भा. धामणस्करांची ही कविता बघा-

फुलाला स्वातंत्र्य आहे कुणाच्याही
ओंजळीत झोकून द्यायचे स्वत:ला,
मानायचेही मनोमन की,-
देठाशी आपला संबंधच नव्हता...
देठाचे स्वातंत्र्य एवढेच की,-
वेदनेतही चेहरा
आत्म्यासारखा निर्लेप ठेवायचा;
फुलाची कुणी चौकशी केली तर म्हणायचे,
''छे, छे. मी नुसता देठच;
पलीकडच्या फुल असलेल्या देठांना विचारा...''

काय फॉर्म आहे या कवितेचा? सकृतदर्शनी या कवितेला फॉर्म नाही. ती मुक्त कविता आहे. कवितेची वैशिष्ट्ये तिच्यात आढळणार नाहीत. पण तरीही या कवितेला 'तिचा असा खास फॉर्म' आहे. तो धामणस्करांना त्यांच्या चिंतनशील आशयासाठी गवसलेला फॉर्म आहे. काय आहे तो फॉर्म? तुम्ही या कवितेतील शब्दांच्या निवडीकडे आणि मांडणीकडे बारकाईने बघा. 'देठाचे स्वातंत्र्य' हा शब्दसमूह एक अतिशय निराळी प्रतिमा कवितेत निर्माण करतो. 'देठाचे स्वातंत्र्य एवढेच की' हा विस्तारित शब्दसमूह स्वातंत्र्य संकल्पनेला मर्यादित करतो. 'एवढेच की' या शब्दांमध्ये बंधनाचं दुखरं भान आहे, सलणारी बोच आहे, काहीच करता येत नाही यातून आलेली हताशता आहे, स्वातंत्र्याचा परीघ मोठा करायची आस आहे. 'देठाचे स्वातंत्र्य एवढेच की' ही कवितेतील ओळ आशयाचे सरळ दोन भाग करते. फुलाचं स्वातंत्र्य हा एक भाग, देठाचं स्वातंत्र्य हा दुसरा भाग. देठाच्या स्वातंत्र्याची तुलना अपरिहार्यपणे फुलाच्या स्वातंत्र्याशी होते. देठाला फुलाला कायमचं घट्ट धरून ठेवता येत नाही. फुलामध्ये गुंतून राहता येत नाही. देठाला फुलापासून एक अनिवार्य विभक्तपण सतत जोपासावं लागतं. आणि असं असूनही देठाला फुलाला आपल्या मुठीत घट्ट धरावंच लागतं. काय विचित्र संबंध आहे हा! फुल कधीही देठ सोडून जाईल आणि आपला आणि देठाचा कधी संबंध होता हे विसरून जाईल. देठाशी अशा घनिष्ठ संबंधाची फुलाला जाणीव नाही आणि गरजही नाही. कारण फुलाला देठाला धरून ठेवायचं नाही, तर देठाला फुलाला धरुन ठेवायचंय. फुलाला देठात गुंतायची गरजच काय? आला एखादा सोबत घेऊन जाणारा हात की फुल सुटलंच देठाच्या मुठीतून. फुलाचं स्वातंत्र्य असं मनमौजी आहे. जे काय करायचंय ते देठाला करायचंय. फुल असेपर्यंत त्याला पकडून ठेवायचंय, त्याचं रक्षण करायचंय. पण हे सगळं करताना फुलात गुंतायचं नाही. फुलाला वाटेल तेव्हा आपल्या पाशातून मोकळं करायचं. देठाचं स्वातंत्र्य हे असं आहे. अपरिहार्यतेतून आलेलं मूक बंधन. फुलाच्या स्वातंत्र्याच्या अगदी विरुद्ध. वरवर दिसणाऱ्या स्वातंत्र्याखाली लपवलेला बंधनाचा चेहरा. स्वातंत्र्य अपरिहार्यतेतून येत नाही, अपरिहार्य झाल्यावर स्वातंत्र्य येतं. पण इथं देठाच्या बाबतीत तर उलट स्थिती आहे. देठाच्या स्वातंत्र्यात अपरिहार्यता आहे, फुलाच्या स्वातंत्र्यात मुक्तता आहे. धामणस्करांनी अत्यंत पीळदार आशय विलक्षण निगुतीनं शब्दात गुंफलाय.

या कवितेत शब्दांची मांडणी अतिशय सर्जक आणि सूचकपणे केलेली आहे. उदाहरण म्हणून कवितेतील सुरुवातीच्या दोन ओळी बघा-

''फुलाला स्वातंत्र्य आहे कुणाच्याही
ओंजळीत झोकून द्यायचे स्वत:ला,''

---

यशाच्या शिखरावर चढल्यानंतर लोकांना फक्त आपलं यश दिसतं, आपण घेतलेले कष्ट नाही !

या ओळी अशा मांडल्या-

''स्वातंत्र्य आहे फुलाला
कुणाच्याही ओंजळीत द्यायचे झोकून स्वत:ला,''


तर काय होईल? आशयाची सूचकता कमी होईल? आशय विस्कटेल? नक्कीच विस्कटेल. कवीला म्हणायचंय ते म्हणताच येणार नाही. शब्द आशयाला फरफटत नेतील. दिशा आणि झोत दोन्हीही चुकतील. या दोन ओळीत फुलाचं स्वातंत्र्य महत्त्वाचं आहे, नुसतं स्वातंत्र्य नाही. फुलाची देठाशी तुलना आहे आणि तुलनेसाठी 'स्वातंत्र्य' शब्द वापरला आहे. स्वातंत्र्य हा सहाय्य करणारा शब्द आहे, त्यामुळे त्याची जागा आणि महत्त्व फुलानंतर.

याशिवाय या कवितेत वापरलेली विरामचिन्हे बघा. ती कवितेच्या आशयाला अधिक घनदाट आणि लवचिक बनवतात.

आता मला सांगा, या कवितेला फॉर्म नाही? आहे ना. तो तुम्हाला शोधावा लागेल! विवेचनात असे कोणत्यातरी प्रकारचे अंगभूत फॉर्म हाती लागत नसतील तर तुमचं लेखन हे साहित्य नाही. ते साहित्य व्हावं यासाठी मेहनत घ्या.

**- डॉ. आनंद कुलकर्णी**
प्राचार्य, ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय
नारायणगांव

●●●



(पृष्ठ क्र. १५ वरून - **लोकमाता अहिल्याबाई होळकर जीवन, कार्य, विचार आणि आजची प्रस्तुतता**)

चरित्रापासून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने त्यांचे ऋण स्मरून पुढची वाट धरण्याची. कारण थोर व्यक्तिंची चरित्रे फक्त वाचण्यासाठी वा भारावून जाण्यासाठी नसतातच मुळी! ती असतात स्फुल्लिंग चेतवण्यासाठी, चांगल्या विचारांना प्रोत्साहीत करण्यासाठी आणि त्या आदर्श चरणांवर चरण ठेवून आचरण करण्यासाठी...

मातोश्री अहिल्यामाईचं जीवनही सतत सर्वांना प्रेरणा देत राहील आणि प्रत्येक स्वाभीमानी भारतमातेच्या लेकराच्या ओठी याच ओळी येतील...

**हे कर्मयोगिनी, राजयोगिनी, जय तू अहिल्यामाता
युगान्युगे अमर राहील, तव यशकीर्तीची गाथा ।।**

**- सौ. साधना योगेश जोशी**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
मा. वि., ठाणे

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**


**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

दृष्टिकोन खूप छोटी गोष्ट आहे; मात्र त्यामध्ये जीवन बदलावण्याचे सामर्थ्य आहे !

# राजसा निजलास का रे! - डॉ. आनंद नाडकर्णी स्मरणलेख

*दिनांक १५ मे रोजी ख्यातनाम ज्येष्ठ मनोविकार तज्ज्ञ, साहित्यिक, चिंतक डॉ. आनंद नाडकर्णी यांचे देहावसान झाले. वैद्यकीय साहित्य आणि कला क्षेत्राचा एक हळवा कोपरा निखळला. त्याच दिवशी काही मिनिटांतच लिहिलेला त्यांच्या वरील स्मरणलेख - संपादक*



फिलॉसॉफर (तत्त्वज्ञ) हा शब्द सॉक्रेटीस, प्लेटो, रसेल या लोकांसाठी आपण नेहमी साहित्यामध्ये वापरत आलेलो आहोत. पण आपल्या पिढीला लाभलेला एक निर्विवाद तर्कवादाचा प्रसारक (रॅशनल थिंकर), लेखक, वक्ता, तत्त्वज्ञ आणि त्याहीपलीकडे माझ्यासारख्या असंख्य डॉक्टर, तरुणांना सतत प्रेरित, मार्गदर्शन करणारे आणि मार्गस्थ ठेवणारं वैद्यकीय क्षेत्रातील एक दीपस्तंभासारखं व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. आनंद नाडकर्णी. आज पहाटे आलेल्या त्यांच्या निधनाची बातमी ही फक्त धक्कादायक नव्हे, तर अनेकांसाठी डोळ्यांपुढे अंधारी आणणारी आहे.

खरंतर डॉ. आनंद नाडकर्णी यांच्याशिवाय एखादी सकाळ उजाडू शकते ही कल्पनाच कधी केली नाही. आज खिडकीतून बाहेर पाहताना सकाळही भकास वाटू लागली. 'आहे ते स्वीकारा, त्यात उत्तमोत्तम काय करता येईल ते करा आणि तर्कवादाची कास कधी सोडू नका', ही सरांनी दिलेली शिकवण मात्र आज पूर्णपणे गळून पडली.

डॉ. आनंद नाडकर्णी आणि माझ्यातील दुवा म्हणजे आमच्या दोघांचे कॉमन गुरू डॉ. रवी बापट. डॉ. रवी बापट या बुद्धीवंताभोवती चकरा मारताना भेटलेले गुरू, सल्लागार, मित्र, गुरुबंधू असं डॉ. आनंद नाडकर्णी सरांसोबतचे माझे नाते होते. डॉ. आनंद नाडकर्णी हा खऱ्या अर्थांनी डॉ. रवी बापटांनी पैलू पाडलेला आणि घडविलेला हिरा होता. 'केईएम'मध्ये आलेल्या साहित्य आणि कलेचा अंश असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने 'डॉ. आनंद नाडकर्णी बनावं' असं डॉ. रवी बापट यांना वाटायचं. इतकं टोकाचं ते गुरू-शिष्य प्रेम होतं. मी एमबीबीएसला असताना जेव्हा लिहू लागलो तेव्हा माझा पहिला लेख वाचून डॉ. रवी बापट सरांनी मला आग्रह धरला की, आनंदला भेट आणि त्याच्याशी मैत्री कर. तेव्हापासून डॉ. आनंद नाडकर्णी सरांसोबत एक वैचारिक, भावनिक असं अतूट नातं तयार झालं.

डॉ. आनंद नाडकर्णी हे 'केईएम'च्या १९७६ बॅचचे विद्यार्थी. त्याकाळी 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये 'हवा कॉलेजची' हे कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी खास सदर असायचं. या सदरातून लिहिण्याच्या निमित्ताने लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांचा जन्म झाला. पुढे त्यांनी Psychiatry घेतल्यामुळे अतिउच्च बुद्धीमत्तेला - अतिउच्च भावनिक बुद्धीमत्तेची जोड मिळाली आणि त्यातून अनेक वर्षे आपण अनुभवलेलं एक आगळंवेगळं रसायन डॉ. आनंद नाडकर्णी हे निर्माण झालं!

जेव्हा व्यसनमुक्तीचा 'व्य'देखील लोकांना कळत नव्हता, गर्द, हशीश या अंमली पदार्थांची नावंदेखील

सुखापेक्षा दुःखामुळेच दोन हृदये अधिक जवळ येतात:
म्हणूनच समदुःख हे समआनंदापेक्षा अधिक बलशाली असते!

भारतात लोकांना माहीत नव्हती तेव्हा १९८८ साली त्यांनी 'गर्दच्या विळख्यात' हे सदर 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये लिहिलं. पुढे मराठी भाषेत विविध विषयांवर तब्बल २७ पुस्तकं लिहिली. नाटकं लिहिली. त्यावरच न थांबता जेव्हा त्यांनी यूट्यूब चॅनल सुरू केलं तेव्हा ते आम्हाला भेटल्यावर आवर्जून सांगायचे की, आता पुस्तकाचं पान सोडून यूट्यूबचे पाय धरा. त्यांचं भावनिक बुद्धीमत्तेचं तत्त्वज्ञान सांगण्यासाठी ते कायम नवीन माध्यमांच्या शोधात असायचे. त्यावरून मला यूट्यूबवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्याची प्रेरणा मिळाली. याचा अर्थ असा की, 'आपण एका विशिष्ट पातळीवर पोहोचलो असलो तरी सतत नवनवीन वाटा धुंडाळणं आपण थांबवता कामा नये', ही मोठी शिकवण मला त्यांच्याकडून मिळाली.

आज एक भावनिक आठवण आवर्जून मनात दाटून येते की, मी २०११-१२ साली मी 'लोकमत' वर्तमानपत्रात राज ठाकरे यांच्याविरोधात आक्रमक शैलीत एक लेख लिहिला होता. त्यादिवशी वर्तमानपत्रात प्रकाशित झालेला माझा लेख मी अद्याप पाहिलादेखील नव्हता. तेव्हा सकाळी सात वाजताच मला नाडकर्णी सरांचा फोन आला की, अमोल लेख छान लिहिलायस. काही काळजी करू नकोस. गरज वाटली तर मी 'राजा'सोबत बोलेन. काही मदत लागली तर सांग. त्यांच्या या एका वाक्याने दिलेल्या आत्मविश्वासाने त्यादिवशी मला आलेल्या अनेक धमक्यांच्या फोनला मी अनेकांशी भिडलो. कारण मला माहीत होतं की, आपल्यामागे डॉ. आनंद नाडकर्णी आहेत. वैजापूरसारख्या एका छोट्याशा तालुक्यातून येणाऱ्या तरुणाला हा आत्मविश्वास देणारा माणूस कसा असेल, याची कल्पना तुम्ही यावरून करू शकता. लेखन, वक्तृत्त्व, नाटककार, संगीत, शायरी, कविता, रेखाचित्र, तबलावादन अशा विविध कलांमध्ये सृजनाची मुशाफिरी करणाऱ्या या अवलियाला 'मानसशास्त्र' या ज्या मूळ आईने जन्म दिला त्या Psychiatry या विषयाला ते कधीच विसरले नाहीत. मानसशास्त्रामध्ये होणारी सर्व नवनवीन संशोधनं आणि मागच्या आठवड्यात कुठलं नवीन औषध किंवा मॉलिक्युल दाखल झालं आहे याची इत्यंभूत माहिती त्यांना असायची. कितीही मुशाफिरी करा, पण आपल्या मूळ ज्ञानाशी फारकत घेऊ नका, हे तत्त्व मी त्यांच्याकडून शिकलो.

डॉ. अल्बर्ट एलिस हे 'रॅशनल इमोशनल बिहेविअरल थिअरी'चे शोधक अर्थात REBT. भारतात 'तर्क आणि विवेकबुद्धीला धरून वागणूक' हा विषय तळागाळात पोहचविणारे प्रामाणिक कार्यकर्ते म्हणजे डॉ. आनंद नाडकर्णी. मी सरांना गमतीत म्हणायचो की, God Can't be everywhere, so he made mother या उक्तीप्रमाणे Dr. Albert Ellis can't be everywhere, so god made Dr. Anand Nadkarni.

दरवर्षी मार्च-एप्रिल-मे महिन्याच्या वीकेंडला ठाण्यात REBT चे वैयक्तिक प्रशिक्षणाचे वर्ग भरायचे. आणि या वर्गात देशभरातील विविध क्षेत्रांतील सर्व वयोगटातील ज्ञानी लोकं हातात पेन आणि कागद घेऊन डोळ्यांत लहान मुलांच्या उत्सुकतेने डॉ. आनंद नाडकर्णी काय शिकवतायत असं दृष्य असायचं. ही त्यांच्यातल्या शिक्षकाची जादू होती. विचारांमध्ये कमालीची स्पष्टता, बोलण्यामध्ये टोकाचा precision आणि त्याचवेळी समोरच्याचं ऐकून घेण्याचा कमालीचा संयम या डेडली कॉम्बिनेशनमुळे त्यांच्यासारखा कम्युनिकेटरच मी पाहिलेला नाही. 'वेध' या त्यांच्या मुलाखतीच्या कार्यक्रमाची एकूण मांडणी त्यांनी एका अतिउच्च पातळीवर नेऊन ठेवली होती. भगवद्गीता आणि वेदांमधील मानसशास्त्र शोधून काढून ते लोकांना समजून सांगण्याचं मोठं काम त्यांच्या हातून घडलं.

(पृष्ठ क्र. २२ वर)

(मुखपृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

विषयावरील व्याख्यान, त्या परिसरातील ज्वलंत प्रश्नांवर चर्चा असे अनेक कार्यक्रम असतात. त्याचबरोबर परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणांना भेटी देण्याचा कार्यक्रम असतो. संमेलनाच्या निमित्ताने निवडक विज्ञान लेखकांचा किंवा विज्ञान प्रसारकांचा सत्कार केला जातो. मविपच्या वार्षिक संमेलनाला हजर राहणे ही एक पर्वणीच असते.

आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत. त्यांच्या मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. उन्हाळ्याच्या आणि दिवाळीच्या सुट्टीत शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरे आयोजित केली जातात. या शिबिरात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करण्याची संधी मिळते. हा कार्यक्रम बहुधा मुंबईच्या मध्यवर्ती कार्यालयात होतो. त्यामुळे लांब राहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा फायदा घेता येत नाही. यावर मात करण्यासाठी एक वेगळीच शक्कल लढवण्यात आली आहे. वेगवेगळ्या विभागांतील उत्साही कार्यकर्त्यांना मुंबईला बोलावून त्यांना प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षित कार्यकर्ते त्यांच्या त्यांच्या विभागात जाऊन तिथल्या मुलांकडून प्रयोग करून घेतात. वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या मुलांना आपले प्रायोगिक कौशल्य दाखविता यावे यासाठी वेगळ्या बाल विज्ञान संमेलनाचे आयोजन केले जाते. या संमेलनात सादर करण्यात आलेल्या दोन प्रयोगांना श्री व्हि. डी. चौगुले आणि श्री. मो. मु. मोहिले पारितोषिक देण्यात येतात. यातील एका पारितोषिकासाठी ८ ते १० स्तरावरील विद्यार्थी, तर दुसऱ्या पारितोषिकासाठी ११ ते १२ स्तरावरील विद्यार्थी निवडले जातात. एवढेच नव्हे तर, महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थी गटाने आपल्या शिक्षणाचा एक भाग म्हणून एखाद्या प्रकल्पावर काम केले असेल तर त्यांच्या कामाची देखील दखल घेतली जाते. अशा विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या शिक्षकांना वार्षिक कार्यक्रमात बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात येतो.

मराठी विज्ञान परिषदेशी मागील ५ दशके मी जुळलेलो आहे. १९७६ ला मी होमी भाभा विज्ञान केंद्रात रुजू झालो. या केंद्राचे संचालक प्रा. वि. गो. कुलकर्णी हे त्या काळात मविपचे उपाध्यक्ष होते. त्यांच्यामुळे मी या संस्थेशी जोडला गेलो आणि विज्ञान व्याख्याने, प्रयोग दिग्दर्शन अशा अनेक कार्यक्रमांमध्ये मी सहभागी झालो. मुंबई शहराच्या रूपारेल महाविद्यालयात भरलेल्या वार्षिक अधिवेशनात मी द्रव नायट्रोजनचा उपयोग करून प्रयोग दाखविले होते. त्यानंतर काही वर्षांनी यवतमाळ जिल्ह्यातील वणी या गावी भरलेल्या अधिवेशनात मेणबत्तीचे रसायनशास्त्र या विषयावर प्रयोग दिग्दर्शन केले. अनेक प्रश्नमंजुषा कार्यक्रमात सहभागी झालो आणि विज्ञान पत्रिकेत वेगवेगळ्या विषयांवर लेख लिहिले. म्हणून या संस्थेने १९९२ साली सोलापूर शहरात भरलेल्या वार्षिक अधिवेशनात माझा विज्ञान प्रसारक म्हणून सत्कार केला. अलीकडच्या काळात मी लोकसत्ता दैनिकातील 'विज्ञान कुतूहल' या सदरासाठी अनेक प्रश्नांची उत्तरे लिहिली आणि मराठी विश्वकोशासाठी लेखन केले आहे. 'मूलद्रव्यांच्या मनोरंजक शोधकथा' हे माझे पुस्तक डिजिटल स्वरूपात मराठी विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे (www.mavipa.org). तसेच, 'काचेचे अजब विश्व' हे माझे पुस्तक पुण्याच्या विद्यार्थी गृह प्रकाशनातर्फे काही महिन्यांपूर्वी प्रकाशित करण्यात आले आहे.

मराठी विज्ञान परिषदेच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने मुंबईच्या चुनाभट्टी परिसरात असलेल्या विज्ञान भवनात रविवार दिनांक २६ एप्रिल रोजी हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला हजर राहण्याची मला संधी मिळाली. हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन भव्य

दिव्य असेच होते. या कार्यक्रमात दोन संस्थांना चि. त्र्य. तासकर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यातील एक संस्था होती कुडाळ येथे कार्यरत असलेली 'शिक्षण विकास' संस्था. या संस्थेने खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करून त्यांना विज्ञान क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. दुसरी संस्था होती शिक्षण वेध. प्रयोग आणि कथाकथनाच्या माध्यमातून ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नवनवीन प्रयोग करून समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा आहे. ही अपेक्षा पूर्ण करणाऱ्या काही विद्यार्थ्यांना या निमित्ताने गौरविण्यात आले. परिषदेकडे आलेल्या प्रकल्पातून तीन प्रकल्पांची बक्षिसासाठी निवड करण्यात आली होती. बक्षीस घेऊन झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांनी आपापल्या प्रकल्पांची माहिती दिली. मुंबई महापालिकेचे माजी वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. अविनाश सुपे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या विषयावर अभ्यासपूर्ण असे व्याख्यान दिले. हीरक महोत्सवाच्या निमित्ताने 'विज्ञान तरंग' या नवीन कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. हा कार्यक्रम ऑनलाइन असून, नवनवीन विज्ञान विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान आयोजित करण्याची योजना आहे. याआधीच 'विज्ञानं जनहिताय' या नावाचा कार्यक्रम दूरदर्शनवर सुरू करण्यात आला आहे. एकंदरीत पाहता विविध मार्गांनी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करण्याचा प्रयत्न 'मराठी विज्ञान परिषद' नियमितपणे करीत आहे. या कामात विद्या प्रसारक मंडळाने सक्रिय सहभाग घ्यावा असे मी यानिमित्ताने सुचवू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

(पृष्ठ क्र.२० वरून – **राजसा निजलास का रे! – डॉ. आनंद नाडकर्णी स्मरणलेख**)

कुणीही काही विचारल्यावर ते समोरच्याला परफेक्ट सल्ला द्यायचे. माझ्यासारखे डॉक्टर विद्यार्थी त्यांच्याशी जेव्हा सल्लामसलत करायचे तेव्हा ते अगदी तर्काला धरून सल्ला देत असत. त्यांच्या सल्ल्यामध्ये कधीही लादणं किंवा अधिकार नसे. ते कधीही न विचारता सल्ला देत नसत. म्हणून आयुष्यात एक मोलाचा, निष्पक्ष सल्लागार गमावल्याचं आज प्रचंड दु:ख होत आहे.

'आयपीएच' आणि 'मुक्तांगण' या दोन संस्थांच्या रुपाने एखाद्या सामाजिक कार्याला वाहून घेणारी संस्था व्यक्तीकेंद्री न राहता एखाद्या मिशनभोवती कशी फिरत राहिल याचा सुयोग्य परिपाठ त्यांनी घालून दिला.

आपल्या आयुष्यात अनेकांचं अस्तित्व आपण गृहित धरलेलं असतं. ते असं अचानक हरवेल असं वाटत नसतं. गीतेमध्ये कृष्ण जेव्हा त्याचा उपदेश देत असतो, विश्वदर्शन घडवत असतो तेव्हा ते समजून घेण्याची दीव्यदृष्टीदेखील तोच अर्जुनाला देत असतो. अर्जुनाला ती जाणीव नसते. त्याला वाटत असतं की, आपणच हे सर्व पाहतोय.

आज असंख्य लोकांना जेव्हा, 'डॉ. आनंद नाडकर्णी नाहीत', हे जुळवून घेण्याची वेळ येईल तेव्हा त्यांनी दिलेली जाणीव की, 'मित्रांनो मी नसल्याचं दु:ख सोसण्याची दृष्टीही मी तुम्हाला शिकवलेली तर्कबुद्धीच देईल', असं ते सांगून गेले. पण सॉरी नाडकर्णी सर, आज भावनेपुढे तर्क हतबल होत आहे आणि म्हणावंसं वाटतंय, राजसा निजलास का रे!

**– डॉ. अमोल अन्नदाते**

भ्रमणध्वनी – ९४२१५१६५५१

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंती उत्साहात साजरी

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा, भारतीय संविधान निर्मितीतील त्यांच्या अमूल्य योगदानाचा, तसेच सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचा परिचय करून देण्यात आला. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमात एकूण १३ स्वयंसेवक सहभागी झाले. कार्यक्रमाचे आयोजन NSS विभागाच्या वतीने करण्यात आले असून, सहाय्यक प्राध्यापक शिवाजी नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या.

### युवा महोत्सव विजेत्यांचा विशेष सत्कार

टॅलेंट अकॅडमी तर्फे दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी युवा महोत्सव विजेत्यांचा विशेष सत्कार कार्यक्रम कात्यायन सभागृहात आयोजित करण्यात आला. विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम सी.एस. रोहित बापट यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या प्रेरणेने यशस्वीरीत्या पार पडला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### QAC गुणवत्ता बैठक –

दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयात QAC बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर, बहिस्थ सदस्य श्री. दर्भे, श्री. तावडे, श्री. जकाती, विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य श्री. कयाळ, आणि महाविद्यालयातील सर्व समिती सदस्य उपस्थित होते. या बैठकीत शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा आणि विविध उपक्रमांवर चर्चा करण्यात आली, उपस्थित सदस्यांनी आपली मते आणि सूचना मांडल्या. शेवटी आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. कल्पिता मुळ्ये यांनी सर्वांचे आभार मानून बैठकीचा समारोप करण्यात आला.




### 'संयुजा' वार्षिक प्रकाशन सोहळा

दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयात 'संयुजा' या वार्षिक अंकाचे प्रकाशन डॉ. प्रसाद पाटील, विभाग प्रमुख, आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका यांच्या हस्ते संपन्न झाले. प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी

विद्यार्थ्यांचे व संपादकीय टीमचे कौतुक केले. या कार्यक्रमात विविध विभागांतील उत्कृष्ट योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.



**बाह्य लेखापरीक्षण (External Audit)**

दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी बांदोडकर महाविद्यालयात बाह्य लेखापरीक्षण (External Audit) आयोजित करण्यात आले होते. या लेखापरीक्षणासाठी बाह्य परीक्षक डॉ. किशन पवार, डॉ. हिरेन दंड आणि डॉ. दिलीप पाटील या त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयाच्या सर्व विभागांचे लेखापरीक्षण करून अहवाल सादर केला. लेखापरीक्षणादरम्यान विविध विभागांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली, अहवालांची पडताळणी करण्यात आली आणि आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन देण्यात आले.




**एक्झिट मिटींग शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ संपन्न**

दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील सर्व उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी एक्झिट मिटींग महाविद्यालयाच्या प्राचार्या विंदा मांजरमकर, उप-प्राचार्या मीनल वानखेडे, परीक्षा नियंत्रक डॉ. संगीता मेश्राम आणि आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. कल्पिता मुळ्ये यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. प्राचार्यांनी सर्वांचे स्वागत करून वर्षभर केलेल्या कार्याचे कौतुक केले. शैक्षणिक निकाल, विभागीय कामगिरी व विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. वर्षभर आयोजित केलेले सेमिनार, कार्यशाळा व अतिथी व्याख्याने यांची माहिती सादर करण्यात आली. NSS, NCC व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांची विशेष दखल घेण्यात आली. पुढील शैक्षणिक वर्षात गुणवत्ता वाढीसाठी विविध सूचना मांडण्यात आल्या. या बैठकीस सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**ग्रंथालय विभाग**

दिनांक ११.०४.२०२६ रोजी महात्मा जोतिबा फुले जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच महात्मा जोतिबा फुले यांच्यावरील माहितीचे पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



दिनांक १३.०४.२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील माहितीचे पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



दि. २३ एप्रिल २०२६ रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून महान नाटककार विलियम शेक्सपियर यांच्या साहित्यकृतींवर आधारित विशेष पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. २३ एप्रिल याच दिवशी विलियम शेक्सपियर यांचा जन्मदिवस आणि स्मृतिदिन असल्यामुळे त्यांच्या साहित्याला अभिवादन करण्यासाठी यांच्या प्रसिद्ध नाट्यकृतींची पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली होती, तसेच त्यांच्याबद्दल माहिती देखील प्रदर्शित करण्यात आली होती.



दिनांक ३०.०४.२०२६ रोजी संत तुकडोजी महाराज जयंती निमित्त संत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.



**दहा दिवसीय एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शिबिर (CATC) उत्साहात संपन्न**

**Combined Annual Training Camp - CATC**

महाविद्यालयामध्ये १ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन NCC, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले दहा दिवसीय एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शिबिर (Combined Annual Training Camp - CATC) दिनांक २१ एप्रिल २०२६ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत अत्यंत शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. या निवासी प्रशिक्षण शिबिरामध्ये मुंबई, ठाणे, पनवेल, नाशिक, रायगड, शहापूर येथील विविध महाविद्यालयांतील सुमारे ४५० हून अधिक NCC छात्रांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध प्रशिक्षण उपक्रमांचा लाभ घेतला.

या शिबिराचे प्रभावी नियोजन, उत्कृष्ट समन्वय आणि यशस्वी नेतृत्व १ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे Commanding Officer मेजर ईशान कृष्णा आणि Admin Officer मेजर श्वेता सिंग यांनी अत्यंत कुशलतेने केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरातील प्रत्येक उपक्रम वेळेचे काटेकोर पालन, शिस्त आणि गुणवत्तेच्या निकषांनुसार यशस्वीपणे राबविण्यात आला.

शिबिराचा मुख्य उद्देश छात्रांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम, सामाजिक बांधिलकी, आत्मविश्वास आणि संकटसमयी कार्य करण्याची क्षमता विकसित करणे हा होता. या उद्देशाला अनुसरून दहा दिवसांचे प्रशिक्षण वेळापत्रक अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आखण्यात आले होते.

दररोज पहाटे पी.टी. परेड आणि योग सत्रांनी दिवसाची सुरुवात होत असे. शारीरिक तंदुरुस्तीबरोबर मानसिक स्थैर्य आणि सकारात्मकता वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या योग सत्रांना छात्रांचा विशेष प्रतिसाद लाभला. Ambika Yog Kutir यांच्या प्रशिक्षकांनी घेतलेल्या योगाभ्यासामुळे छात्रांमध्ये

प्राप्तीपेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक असतो.

आरोग्याविषयी जागरूकता, मानसिक एकाग्रता आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

NCC प्रशिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा भाग असलेल्या स्कॉड ड्रिल, संचलन सराव आणि शिस्तीवर शिबिरामध्ये विशेष भर देण्यात आला. विविध तुकड्यांमधील परेड स्पर्धांमध्ये छात्रांनी टापटीप गणवेश, एकसंध हालचाली आणि प्रभावी संचलनाद्वारे आपली गुणवत्ता सिद्ध केली. शिस्त, समयसूचकता आणि संघभावना यांचे उत्कृष्ट दर्शन या उपक्रमांतून घडले.

शिबिराचे प्रमुख आकर्षण ठरले ते शस्त्र प्रशिक्षण (Weapon Training) आणि २२ रायफल फायरिंग. छात्रांना शस्त्र हाताळणीचे नियम, सुरक्षिततेचे निकष, रायफलची रचना आणि वापर याविषयी सखोल मार्गदर्शन देण्यात आले. त्यानंतर २२ रायफल फायरिंगचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आणि सराव घेण्यात आला. या प्रशिक्षणामुळे छात्रांमध्ये आत्मविश्वास, धैर्य, एकाग्रता आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली.

शिबिरादरम्यान विविध विषयांवरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. नेतृत्वगुण विकास (Leadership Qualities), महिला सक्षमीकरण (Women Empowerment), व्यक्तिमत्त्व विकास (Personality Development), आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management), तसेच विद्या प्रसारक मंडळाचे TMC लॉ कॉलेज तर्फे legal awareness चे एक विशेष व्याख्यान गर्ल कॅडेटसाठी आयोजित करण्यात आले. यावेळी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार व उप प्राचार्य प्रा. विनोद वाघ यांनी विशेष मेहनत घेतली. सामाजिक उत्तरदायित्व, आरोग्य व स्वच्छता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी छात्रांना मोलाचे मार्गदर्शन केले. या व्याख्यानांमुळे छात्रांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, आत्मभान आणि समाजसेवेची प्रेरणा निर्माण झाली.

आपत्ती व्यवस्थापनाच्या विशेष सत्रामध्ये आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे, प्रथमोपचार, बचावकार्य आणि नागरिकांना मदत करण्याच्या विविध पद्धतींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. संकटसमयी शांतपणे, धैर्याने आणि जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा या सत्रातून छात्रांना मिळाली.

शारीरिक क्षमता आणि खेळाडूवृत्ती विकसित करण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले. कबड्डी, खो-खो, धावणे, व्हॉलीबॉल, तसेच इतर मैदानी खेळांमध्ये छात्रांनी उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धांमुळे संघभावना, समन्वय, चिकाटी आणि निरोगी स्पर्धात्मक वृत्ती अधिक वृद्धिंगत झाली.

याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम, समूहचर्चा, प्रेरणादायी उपक्रम आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांद्वारे छात्रांमध्ये मैत्री, एकोपा आणि सांस्कृतिक जाणीव दृढ करण्यात आली. प्रत्येक दिवस नवीन अनुभव, शिक्षण आणि आत्मविकासाच्या संधींनी परिपूर्ण होता. शिबिरातील वातावरण विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनामध्ये Permanent Army Staff यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले. SM सिंग, BHM वैभव पाटील, CHM कुंभार तसेच इतर सैन्य कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण, शिस्त आणि व्यवस्थापनाच्या प्रत्येक घटकात विशेष मेहनत घेतली. त्याचप्रमाणे Major माधवी जोशी यांनी Camp Adjutant म्हणून अत्यंत जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

महाविद्यालय प्रशासनाचे सहकार्य हे या शिबिराच्या यशामागील एक भक्कम आधारस्तंभ ठरले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी संपूर्ण शिबिरादरम्यान आवश्यक सुविधा, स्वच्छता, निवास व्यवस्था आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष दिले. तसेच

कॅप्टन बिपिन धुमाळे यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वयंपाकासाठी लागणारा LPG गॅस, Bisleri sponsorship, accommodation, logistics आणि cleanliness यांसारख्या सर्व महत्त्वाच्या बाबींमध्ये २४ x ७ सतत समन्वय राखून कोणतीही कमतरता भासू दिली नाही.

शिबिराच्या समारोप समारंभामध्ये Commanding Officer मेजर ईशान कृष्णा यांनी आपल्या Closing Address मध्ये महाविद्यालय प्रशासनाच्या सहकार्याची विशेष दखल घेतली. त्यांनी VPM चे चेअरमन डॉ. विजय बेडेकर, प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर आणि कॅप्टन बिपिन धुमाळे यांचे विशेष कौतुक करून त्यांना बटालियनतर्फे प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून कृतज्ञता व्यक्त केली.

दहा दिवसांच्या या निवासी प्रशिक्षण शिबिरामुळे छात्रांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वक्षमता, शिस्त, देशप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. NCC च्या "Unity and Discipline" या ब्रीदवाक्याची प्रभावी रुजवण या शिबिरातून यशस्वीरीत्या करण्यात आली.

हे शिबिर छात्रांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत प्रेरणादायी, ज्ञानवर्धक आणि अविस्मरणीय ठरले.





## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१ एप्रिल २०२६ आणि २ एप्रिल २०२६ रोजी LLM सत्र - ३ सराव परीक्षा विधी महाविद्यालयात घेण्यात आल्या. तसेच २ एप्रिल २०२६ रोजी तृतीय विधी वर्ष सत्र - ५ चे अनुत्तीर्ण विषयांचे अंतर्गत वर्ग चाचणी, प्रकल्प व मूल्यमापनच्या परीक्षा घेण्यात आल्या.

**पोलिस स्टेशन भेट**

दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी विद्यार्थ्यांना पोलिस प्रशासनाची प्रत्यक्ष कार्यपद्धती समजावी, तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस यंत्रणा कशा प्रकारे कार्यरत असते याची सखोल माहिती मिळावी या उद्देशाने दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी सायं. ४:३० वा ठाणे सिटी पोलिस स्टेशन येथे शैक्षणिक भेट अत्यंत यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली.




या शैक्षणिक भेटीत एकूण ४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थी नियोजित वेळेत उपस्थित राहून कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी झाले. ही भेट सहाय्यक प्राध्यापिका सौ. चांदनी घोगरे व सहाय्यक प्राध्यापक श्री. मनोजकुमार नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. त्यांना सहाय्यक प्राध्यापिका कु. प्रेरणा वसावे, तसेच कनिष्ठ ग्रंथपाल श्री. शुभम पवार यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाची सुरुवात पोलिस अधिकाऱ्यांच्या औपचारिक स्वागत व परिचयाने करण्यात आली. सन्मान व कृतज्ञतेच्या भावनेतून विद्या प्रसारक

मंडळाचे विधी महाविद्यालयातर्फे सहाय्यक पोलिस निरीक्षक सौ. सपना ताटे यांचा सत्कार सहाय्यक प्राध्यापक श्री. मनोजकुमार नाईक यांच्या हस्ते अत्यंत आदरपूर्वक करण्यात आला.



तसेच सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. कृष्णा कोकणे यांचा सत्कार सहाय्यक प्राध्यापिका कु. प्रेरणा वसावे यांच्या हस्ते करण्यात आला.

**मार्गदर्शन – सहाय्यक पोलिस निरीक्षक सौ. सपना ताटे :**

सहाय्यक पोलिस निरीक्षक सौ. सपना ताटे यांनी पोलिस स्टेशनच्या कार्यपद्धतीवर अत्यंत सखोल, प्रभावी व ज्ञानवर्धक मार्गदर्शन केले. त्यांनी २४ तास कार्यरत असलेल्या पोलिस यंत्रणेचे स्वरूप स्पष्ट करताना पेट्रोलिंग, तक्रार नोंदणी, तपास प्रक्रिया, संज्ञेय व असंज्ञेय गुन्हे, तसेच FIR नोंदणीची अचूक पद्धत याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच तक्रारदारांशी संवेदनशीलतेने कसे वागावे व कामाचा ताण कसा व्यवस्थापित करावा याबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. बाजारपेठेच्या परिसरात असलेल्या पोलिस स्टेशनमध्ये सतत सतर्कता राखण्याचे महत्त्व त्यांनी विशेष अधोरेखित केले.

**मार्गदर्शन – सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. कृष्णा कोकणे:**

यानंतर सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. कृष्णा कोकणे यांनी पोलिस कार्यातील तांत्रिक व प्रक्रियात्मक बाबी स्पष्ट केल्या. त्यांनी केस समरी, जप्ती पंचनामा, तसेच मालमत्ता जप्ती प्रक्रिया यांचे सविस्तर स्पष्टीकरण केले. तसेच गोपनीय विभाग, सायबर विभाग, नोंदवही विभाग इत्यादी विविध शाखांविषयी माहिती दिली.




यानंतर विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले व अधिकाऱ्यांनी त्यांची समर्पक व सविस्तर उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापिका सौ. चंदनी घोगरे यांनी सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले.

६ एप्रिल २०२६ आणि ८ एप्रिल २०२६ रोजी वि.प्र. मं. चे विधी महाविद्यालयात LLM सत्र – २ चे परीक्षा घेण्यात आल्या.

७ एप्रिल २०२६ रोजी मुंबई विद्यापीठाने प्रथम वर्ष विधी सत्र – १ चा निकाल जाहीर केला.

८ एप्रिल २०२६ ते १७ एप्रिल २०२६ या कालावधीत मुंबई विद्यापीठाने तृतीय वर्ष विधी सत्र – ५ आणि द्वितीय वर्ष विधी सत्र – ३ च्या परीक्षा घेण्यात आल्या.

महाविद्यालयात Forensic Science and Forensic Evidence या विषयावर दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी सायं. ५:०० वाजल्यापासून पाणिनी सभागृह येथे एक माहितीपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष LL.B. च्या विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला, ज्यातून सर्व वर्गांमधील विद्यार्थ्यांची उत्सुकता स्पष्ट झाली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून केली.

त्यांनी आधुनिक न्यायव्यवस्थेमध्ये फॉरेन्सिक सायन्सचे वाढते महत्त्व आणि न्यायदान प्रक्रियेमधील त्याची अनिवार्य भूमिका अधोरेखित केली. कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या कु. निशा मेनन या एक प्रख्यात फॉरेन्सिक तज्ज्ञ असून त्या Square Forensic Advisors Pvt. Ltd. या संस्थेच्या संस्थापक व तांत्रिक संचालक आहेत. ही संस्था व्यक्ती, कॉर्पोरेट्स, कायदा अंमलबजावणी यंत्रणा, तसेच भारत व परदेशातील न्यायव्यवस्थेला फॉरेन्सिक सेवा पुरवणारी एक नावीन्यपूर्ण संस्था आहे. कु. मेनन यांचा शैक्षणिक प्रवास अत्यंत प्रभावी असून, त्यांनी विज्ञान (जीवशास्त्र) मध्ये पदवी, Legal Forensic Science मध्ये पदव्युत्तर डिप्लोमा, विज्ञान (मानसशास्त्र) मध्ये पदव्युत्तर पदवी, तसेच Digital and Cyber Forensics Related Law मध्ये पदव्युत्तर डिप्लोमा प्राप्त केला आहे. त्या एक अनुभवी फॉरेन्सिक प्रशिक्षक असून National Judicial Academy, भोपाळ येथे त्या CBI न्यायालयांचे न्यायाधीश, POCSO न्यायालयांचे न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश, तसेच आंतरराष्ट्रीय न्यायाधीशांना प्रशिक्षण देत आहेत. याशिवाय त्यांनी महाराष्ट्र न्याय अकादमी, बिहार न्याय अकादमी, तसेच गृह मंत्रालयांतर्गत Rashtriya Raksha University येथे विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये योगदान दिले आहे. त्यांचे कौशल्य Questioned Document Examination, Fingerprint Analysis, Cyber व Digital Forensics, Crime Scene Investigation and Reconstruction, तसेच Criminal आणि Corporate Investigations या क्षेत्रांमध्ये आहे. चोरी, घरफोडी, आग, अपघात यांसंबंधित प्रकरणांमध्येही त्यांना विशेष प्रावीण्य आहे. त्यांची विविध न्यायालयांनी, त्यात माननीय मुंबई उच्च न्यायालयाचाही समावेश आहे, तज्ज्ञ मत देण्यासाठी नियुक्ती केली आहे. कु. मेनन यांनी Sushant Singh Rajput प्रकरण, Hathras प्रकरण, Delhi riots, Shraddha Walkar हत्या प्रकरण इत्यादी महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये दिलेल्या फॉरेन्सिक विश्लेषणामुळे राष्ट्रीय पातळीवर विशेष ओळख मिळवली आहे. त्या Aaj Tak, Republic TV, India Today, Times Now यांसारख्या प्रमुख राष्ट्रीय माध्यमांवरही वारंवार दिसून आल्या आहेत. कार्यशाळेदरम्यान कु. मेनन यांनी अत्यंत सविस्तर व प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी तपास प्रक्रियेमध्ये फॉरेन्सिक सायन्सचा उपयोग, पुराव्यांचे संकलन, जतन आणि न्यायालयातील ग्राह्यता याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या सत्रामुळे सैद्धांतिक कायदेविषयक ज्ञान आणि प्रत्यक्ष फॉरेन्सिक व्यवहार यामधील दरी कमी झाली. ही कार्यशाळा संवादात्मक आणि विचारप्रवर्तक ठरली. विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून फॉरेन्सिक पुराव्यांची भूमिका आणि न्यायव्यवस्थेमधील त्याचे महत्त्व याबाबत मोलाची माहिती मिळवली. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. रुपाली जामोदे यांनी यशस्वीरीत्या केले. त्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला. एकूणच, ही कार्यशाळा अत्यंत माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरली. विद्यार्थ्यांना फॉरेन्सिक सायन्सविषयी आवश्यक ज्ञान आणि त्याची कायदेशीर प्रक्रियेमधील उपयुक्तता समजण्यास मदत झाली.





**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह दिनांक : ८ एप्रिल २०२६ ते १५ एप्रिल २०२६**

महाविद्यालयात शासनाच्या परिपत्रकानुसार दिनांक ०८ एप्रिल २०२६ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता

सप्ताह' आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे आणि सहाय्यक प्राध्यापक प्रेरणा वसावे यांनी कार्य केले. या उपक्रमास प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांमध्ये 'समता, न्याय आणि सामाजिक जाणीव या मूल्यांचा प्रसार करणे' हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. संपूर्ण आठवडाभर विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह आयोजित कार्यक्रम**

| | |
|---|---|
| राज्यघटना उद्देशिकेचे वाचन | ८ एप्रिल २०२६ |
| 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता व न्याय' व्याख्यान | ९ एप्रिल २०२६ |
| निबंध स्पर्धा | १० एप्रिल २०२६ |
| प्रश्नमंजुषा स्पर्धा | ११ एप्रिल २०२६ |
| संत गाडगे महाराज यांच्या सामाजिक कार्यावर आधारित जनजागृती कार्यक्रम | १३ एप्रिल २०२६ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यान आणि चर्चासत्र | १५ एप्रिल २०२६ |

दिनांक ०८ एप्रिल २०२६ रोजी कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आली. हा उपक्रम सहाय्यक प्राध्यापक कृष्णा कामत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या सत्रामध्ये राज्यघटनेतील मूलभूत मूल्ये व मूलभूत अधिकार यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी न्याय्य व समताधिष्ठित समाज घडविण्यासाठी राज्यघटनेतील मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे यांनी केले.

या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, अध्यापन व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते व त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला, त्यामुळे कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण व प्रभावी ठरला.

दिनांक ०९ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित व्याख्यानमालेचे आयोजन सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे व सहाय्यक प्राध्यापक प्रेरणा वसावे यांनी केले. या व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक समता व न्याय या दृष्टीकोनाबाबत मौल्यवान माहिती व मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या प्रस्ताविक भाषणाने झाली. त्यांनी आजच्या समाजात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे यांनी केले. यावेळी सुनील गवई, अवधूत वीरकर, सचिन अहिरे, कल्पेश निकुंभ, तसेच सहाय्यक प्राध्यापक प्रेरणा वसावे यांनीही भाषणे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणी व कार्याबद्दल आपले मत व्यक्त केले.

दिनांक १० एप्रिल २०२६ (तिसरा दिवस) रोजी सहाय्यक प्राध्यापक चांदनी घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'निबंध स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांना सामाजिक समता, न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांविषयी आपले विचार मांडण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये उत्कृष्ट, अभ्यासपूर्ण आणि विचारपूर्ण निबंध सादर केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या राज्यघटनात्मक मूल्यांविषयीच्या

जाणिवेत वाढ झाली, तसेच सामाजिक सुधारणा व समतेबाबत जागरूकता निर्माण झाली.

**स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत:**

प्रथम क्रमांक : श्री. सुनील बाबुराव गवई

द्वितीय क्रमांक : श्री. सचिन ए. अहिरे

तृतीय क्रमांक : कु. प्राची कोराणे व कु. शीतल नाटेकर

महाविद्यालय सर्व विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करते. ही स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरून सामाजिक समता सप्ताहाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यात महत्त्वपूर्ण ठरली.






## ११ एप्रिल २०२६ – प्रश्नमंजुषा (Quiz) स्पर्धेचा अहवाल

दिनांक ११ एप्रिल २०२६ (चौथा दिवस) रोजी सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाच्या अंतर्गत हा उपक्रम वि.प्र.मं चे विधी महाविद्यालय ठाणे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे यांनी केले. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राज्यघटनात्मक मूल्ये आणि सामाजिक समता याविषयीचे ज्ञान वाढविणे हा होता. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत प्रश्नांची उत्तरे देत आपली माहिती आणि समज प्रदर्शित केली. हा उपक्रम माहितीपूर्ण, संवादात्मक व प्रेरणादायी ठरला. तसेच विद्यार्थ्यांमध्ये समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यात यशस्वी ठरला.

दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी संत गाडगे महाराज यांच्या सामाजिक कार्यावर आधारित जनजागृती कार्यक्रम डॉ. रुपाली जामोडे यांनी आयोजित केला. त्यांनी सामाजिक सुधारणा आणि स्वच्छता चळवळीतील संत गाडगे महाराज यांच्या उल्लेखनीय योगदानावर प्रकाश टाकला. या सत्रामध्ये प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. त्यांनी संत गाडगे महाराज यांच्या विचारांची आजच्या समाजातील उपयुक्तता स्पष्ट केली. तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छता, समता आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. याच दिवशी सहाय्यक प्राध्यापक हेतल मेशेरी यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या सामाजिक कार्यावर व्याख्यान दिले. त्यांनी शिक्षण आणि समाजउन्नतीसाठी महात्मा फुले यांनी केलेल्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच उपप्राचार्य डॉ. विनोद वाघ यांनी उपस्थितांना संबोधित करत महात्मा जोतिबा फुले, संत गाडगे महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या सामाजिक कार्याचा आणि त्यांच्या दीर्घकालीन प्रभावाचा सविस्तर आढावा घेतला.

दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आणि याच दिवशी सामाजिक समता सप्ताहाची सांगता करण्यात आली. या सत्राचे आयोजन सहाय्यक प्राध्यापक प्रेरणा वसावे, सहाय्यक प्राध्यापक यतीन पंडित, डॉ. व्ही. एच. वाघ आणि डॉ. एस. व्ही. जे. यांनी केले. त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्य, विचारसरणी आणि सामाजिक न्याय व समतेसाठी दिलेल्या योगदानाबाबत सखोल मार्गदर्शन केले.

सहाय्यक प्राध्यापक यतीन पंडित यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांवर सविस्तर भाषण केले. त्यांनी आर्थिक विकेंद्रीकरण, कामगार कल्याण, औद्योगिकीकरण, तसेच आर्थिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी राज्याची भूमिका याबाबत डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे स्पष्टीकरण केले. त्यांनी अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. आंबेडकर यांचे योगदान स्पष्ट करत सार्वजनिक वित्तव्यवस्था, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया संदर्भातील मांडणी, तसेच सामाजिक विषमता कमी करण्यासाठी व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या धोरणांचा आढावा घेतला.

प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत डॉ. आंबेडकर यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या सन्मानार्थ देशभरात स्थापन झालेल्या विविध विद्यापीठे व संस्थांचा उल्लेख करून शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दीर्घकालीन परंपरा स्पष्ट केली. तसेच त्यांनी भारतीय राज्यघटनेतील समता, मूलभूत अधिकार आणि सामाजिक न्यायाशी संबंधित महत्त्वाच्या तरतुदींचे स्पष्टीकरण केले. याशिवाय, शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या डॉ. आंबेडकर यांच्या प्रभावी संदेशाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि वैयक्तिक प्रगती, तसेच समाजाच्या विकासासाठी या तत्त्वांचा अवलंब करण्याचे आवाहन केले.







कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक प्रेरणा वसावे यांनी केले आणि त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सुरळीत समन्वयन सुनिश्चित केले. आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी सर्व वक्ते, आयोजक आणि सहभागी यांचे मनःपूर्वक आभार मानले. या कार्यक्रमास सर्व अध्यापन व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग नोंदविला, त्यामुळे कार्यक्रम अर्थपूर्ण आणि यशस्वी ठरला. उद्देशिकेच्या वाचनाव्यतिरिक्त सर्व उपक्रम सायंकाळी ७:०० वाजता लेक्चर हॉल L-4 येथे पार पडले. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थी, अध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. सामाजिक समता सप्ताह अत्यंत माहितीपूर्ण व प्रेरणादायी ठरला. या उपक्रमाद्वारे

राज्यघटनात्मक मूल्ये, सामाजिक न्याय आणि महान समाजसुधारकांच्या कार्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात यश मिळाले. तसेच विद्यार्थ्यांना समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांचा आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करण्याची प्रेरणा मिळाली.

**१३ एप्रिल २०२६ रोजी मुंबई विद्यापीठाने तृतीय वर्ष विधी सत्र – ५ पुनर्मूल्यांकन निकाल लागला.**

**कला, नाट्य आणि विधी साक्षरता : प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कला, नाट्य आणि विधी साक्षरता या प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कला आणि नाट्य यांसारख्या सर्जनशील माध्यमांद्वारे विधी साक्षरतेचे सैद्धांतिक ज्ञान, तसेच व्यावहारिक अनुभव प्रदान करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता. अभ्यासक्रमात विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, विधी जनजागृती उपक्रम, पथनाट्य, पटकथा लेखन, पोस्टर निर्मिती आणि घोषवाक्य लेखन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश करण्यात आला होता.

या प्रमाणपत्र अभ्यासक्रमास दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारंभ झाला. अभ्यासक्रमाचे उद्घाटन मा. श्री. रवींद्र पजणकर, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी चित्रपट अभिनेते व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. निकेत मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संसाधन व्यक्ती श्री. ओंकार सुब्रमणीयन यांचीही उपस्थिती लाभली.

सुधारित वेळापत्रकानुसार हा अभ्यासक्रम एकूण ३० तासांचा आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये व्याख्याने, प्रकल्प कार्य, पथनाट्य सादरीकरण आणि लेखी परीक्षा यांचा समावेश होता. एकूण १६ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. अभ्यासक्रमातील व्याख्याने व प्रशिक्षण सत्रे खालील संसाधन व्यक्तींनी प्रभावीपणे घेतली श्री. विनोद एच. वाघ यांनी विधी सहाय्य चळवळीचा इतिहास, विधी साक्षरता आणि संबंधित न्यायालयीन घडामोडींवर मार्गदर्शन केले. श्री. ओंकार सुब्रमणीयन यांनी विद्यार्थ्यांना नाट्यकला, अभिनय कौशल्ये आणि पथनाट्य सादरीकरणाचे प्रशिक्षण दिले. याशिवाय विद्यार्थ्यांना विधी जनजागृती चित्रकलेची संकल्पना व प्रात्यक्षिके दाखविण्यात आली, ज्यायोगे त्यांनी दृश्य कलेच्या माध्यमातून विधी विषय प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्य आत्मसात केले. व्यावहारिक घटकाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांनी विधी साक्षरतेवर आधारित पथनाट्य तयार करून सादर केले. अंतिम सादरीकरण दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी मूट कोर्ट कक्षामध्ये आयोजित करण्यात आले. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, समन्वय आणि सामाजिक जाणीव प्रभावीपणे दिसून आली. त्याच दिवशी मूल्यांकन पद्धतीनुसार अंतिम परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये सादरीकरण, पोस्टर निर्मिती, पथनाट्य आणि लेखी परीक्षा यांचा समावेश होता. मला आनंदाने नमूद करावयाचे आहे की, सर्व १६ विद्यार्थी परीक्षेत यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले. या अभ्यासक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये विधी साक्षरतेबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच त्यांचे संवाद कौशल्य, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव विकसित करण्याचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या साध्य केले.

**NEET परीक्षा २०२६ :**

महाविद्यालयामध्ये NEET २०२६ परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. आमचा केंद्र क्रमांक ३११८२१४ आहे. प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार या केंद्र अधीक्षक म्हणून कार्यरत असून, उपप्राचार्य डॉ. व्ही. एच. वाघ हे उपकेंद्र अधीक्षक

म्हणून कार्यरत आहेत. दिनांक ३ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या NEET २०२६ परीक्षेसाठी एकूण २८८ उमेदवार परीक्षेस उपस्थित राहणार आहेत. परीक्षेच्या नियोजन व व्यवस्थापनासंदर्भातील बैठका दिनांक २२, २४ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी उपस्थित राहून पार पडल्या.

**२५ एप्रिल २०२६ रोजी तृतीय विधी वर्ष सत्र – ६ चे माजी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी 'मसुदा लेखन, निवेदन लेखन व हस्तांतरण लेखन' परीक्षा घेण्यात आल्या.**

**महाविद्यालयाचा ५१ व्या बॅचचा विधी पदवी प्रदान सोहळा उत्साहात संपन्न:**

विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाचा ५१ व्या बॅचचा विधी पदवी प्रदान सोहळा दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाविद्यालयाच्या प्रांगणातील पाणिणी सभागृहात आयोजित या समारंभाला विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची, माजी विद्यार्थ्यांची आणि विधी क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी स्वागतपर भाषण करत उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सादर केला. त्यांनी महाविद्यालयाच्या ५४ वर्षांच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करत, अनेक यशस्वी न्यायाधीश, वकील व कायदेतज्ज्ञ घडविण्यात महाविद्यालयाने बजावलेली भूमिका अधोरेखित केली. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती श्रीमती शर्मिला देशमुख आणि ठाणे जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री. एस. बी. अग्रवाल उपस्थित होते. त्यांच्या हस्ते एकूण १५० विद्यार्थ्यांना विधी पदव्या प्रदान करण्यात आल्या. संस्थेच्या परंपरेप्रमाणे सर्व अतिथी आणि पदवीधर विद्यार्थ्यांनी लाल रंगाची पगडी आणि उपरजे परिधान करून पदवी स्वीकारली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी महिलांच्या विधी क्षेत्रातील वाढत्या सहभागाचे स्वागत करत, अधिकाधिक महिला वकिलांनी न्यायव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, 'आजच्या काळात महिलांकडे नेतृत्वगुण, विश्लेषण क्षमता आणि संवेदनशीलता आहे, ज्यामुळे त्या न्यायव्यवस्थेत प्रभावी भूमिका बजावू शकतात.' वकीली व्यवसायात नवनवीन संधी निर्माण होत आहेत, त्यात ही संधी शोधण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री. एस. बी. अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक आयुष्यात प्रामाणिकपणा, संयम आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा सल्ला दिला. वकिली हा केवळ व्यवसाय नसून, समाजसेवेचे माध्यम आहे. त्यामुळे शॉर्टकट टाळून परिश्रम, नैतिकता आणि कायद्याचे भान ठेवून काम केल्यासच दीर्घकालीन यश मिळते, असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, श्री. सुधाकर आगरकर, श्री. रवींद्र रसाळ आणि श्री. दिलीप जोशी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. विजय बेडेकर यांनी विद्यार्थ्यांनी केवळ व्यावसायिक प्रगतीचं नव्हे तर समाजाप्रती जबाबदारीही पार पाडावी, असे आवाहन केले.

या सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विविध विषयांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कृष्णा

कामथ यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विनोद एच वाघ यांनी केले. संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध, दिमाखदार आणि भावनिक वातावरणात पार पडला असून, पदवीधर विद्यार्थ्यांसाठी हा दिवस आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण ठरला.



**मुंबई मा. उच्च न्यायालय परीक्षा :**

महाविद्यालयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई आस्थापनेवर लिपिक, वाहनचालक, शिपाई, हमाल या पदाकरिता २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० परीक्षा घेण्यात आल्या.

**AECC स्टडी अब्रॉड कन्सल्टंट्स येथे करिअर मार्गदर्शन भेट**

दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालयातील प्रथम वर्ष विधीचे विद्यार्थी कु. सई दांडेकर आणि श्री. अवधूत वीरकर यांनी परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधींबाबत करिअर मार्गदर्शन व समुपदेशनासाठी AECC Study Abroad Consultants येथे भेट दिली. ही भेट प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार आयोजित करण्यात आली होती. सहाय्यक प्राध्यापिका सौ. कृष्णा कामत यांनी कार्यक्रमाच्या शिक्षक समन्वयक म्हणून कार्य केले, तसेच विद्यार्थ्यांसोबत मार्गदर्शन सत्रास उपस्थित राहिल्या. AECC Study Abroad Consultants ही संस्था आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी मोफत समुपदेशन सेवा पुरविणारी संस्था म्हणून परिचित असून विद्यार्थ्यांना विद्यापीठ निवड, प्रवेश प्रक्रिया, तसेच ऑस्ट्रेलिया, अमेरिका, युनायटेड किंगडम आणि कॅनडा यांसारख्या देशांतील व्हिसा प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करते.

या भेटीदरम्यान समुपदेशकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून ऑस्ट्रेलियातील विद्यापीठांमध्ये एल.एल.एम. (Master of Laws) पदवी अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, पात्रता निकष, उपलब्ध विशेष अभ्यासक्रम, शिष्यवृत्तीच्या संधी, तसेच शिक्षण पूर्ण झाल्यानंतरच्या करिअर संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उच्च विधी शिक्षणासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या ऑस्ट्रेलियातील संभाव्य विद्यापीठांची यादीदेखील विद्यार्थ्यांना देण्यात आली. हे मार्गदर्शन सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माहितीपूर्ण व उपयुक्त ठरले. यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संधी, तसेच विधी क्षेत्रातील भविष्यातील करिअर नियोजनाबाबत स्पष्टता मिळाली.

**२८ एप्रिल २०२६ कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम**

विद्या प्रसारक मंडळाच्या परिसरात आयोजित एनएसएस शिबिरामध्ये, विद्या प्रसारक मंडळ विधी महाविद्यालय ठाणे च्या विधी साहाय्य कक्षामार्फत 'कायदेविषयक जनजागृती' कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सायं. ६.०० वाजता पार पडला.



विद्यार्थ्यांमध्ये विविध कायदेविषयक जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.हा कार्यक्रम प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच विधी साहाय्य कक्षाचे प्रमुख डॉ. विनोद वाघ यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम प्रभावी व यशस्वी ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक शिवाजी बिबे यांनी उत्कृष्टरीत्या केले. त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व संचालन सुरळीतपणे पार पाडले. या कार्यक्रमात मान्यवर वक्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सहाय्यक प्राध्यापक मनोज कुमार नाईक यांनी 'रॅगिंगविरोधी कायदे' या विषयावर सविस्तर माहिती दिली. त्यांनी रॅगिंगचे दुष्परिणाम, त्यासंबंधीचे कायदेशीर परिणाम, तसेच शैक्षणिक वातावरण सुरक्षित व सुसंस्कृत ठेवण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर सचिन अहिरे यांनी सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी इंटरनेटवरील विविध धोके, सायबर गुन्हे आणि त्यापासून बचाव करण्यासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली. या कार्यक्रमात एनएसएस स्वयंसेवक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला आणि विविध कायदेशीर बाबींबद्दल माहिती मिळवली. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापक बिपिन धुमाळे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी प्रमुख पाहुणे, मार्गदर्शक, आयोजक आणि उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. एकूणच, हा कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली.

**२८ एप्रिल २०२६ – प्रादेशिक सहसंचालक उच्च शिक्षण बैठक**

२८ एप्रिल २०२६ रोजी प्रादेशिक सहसंचालक उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांची बैठक पिल्लाई कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पनवेल येथे बैठक पार झाली. या बैठकीस विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महानगर पालिका विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ श्रीविद्या जयकुमार, सहाय्यक प्राध्यापक श्री. शिवाजी बिबे आणि अधिक्षक सौ. रंजन अनिल करंदीकर उपस्थित होत्या. प्रादेशिक सहसंचालकानीं विद्यार्थी शिष्यवृत्ती, मुलींना मोफत शिक्षण, सेवानिवृत्ती DCPS /NPS भ.नि.नि प्रकरणे ह्या वर माहिती दिली. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश व उपस्थिती या बाबत चर्चा करण्यात आली आणि कर्मचारी निवृत्त होण्याआधी ठरवून दिलेल्या वेळेत कार्यालयात जमा करणे अशा सूचना देण्यात आल्या. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या नियमाप्रमाणे विधी महाविद्यालयाचा कार्यभार करण्याच्या संदर्भात प्राचार्यानी डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्रश्न उपस्थित केला. तसेच याबाबत शासन स्तरावरून निर्णय होत असल्यामुळे आपण या संदर्भात पत्र व्यवहार करावा असे प्राचार्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले.


**२९ एप्रिल २०२६ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी प्रथम वर्ष विधी सत्र – २ चे अतिरिक्त अंतर्गत 'वर्ग चाचणी' घेण्यात आल्या.**

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१७ एप्रिल २०२६ : सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांनी मार्च २०२६ मध्ये सर्व विद्यार्थ्यांसाठी 'ईआरपी ट्रान्सफॉर्मेशन ब्लूप्रिंट'- एका व्यावसायिक समस्येसाठी ईआरपी प्रोटोटाइप तयार करणे, हा उपक्रम आयोजित केला.



१८ एप्रिल २०२६ : सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांनी मुंबई विद्यापीठाच्या सहयोगाने रामानंद आर्य डी.ए.व्ही. कॉलेज, मुंबई येथे आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत 'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अँड एम्प्लॉयी वेल-बिंग : एक्सामिनिंग मेंटल हेल्थ अँड फिनान्शिअल स्ट्रेस इन हायब्रीड वर्क एनव्हीरॉन्मेंट' या शीर्षकाचा शोधनिबंध सादर केला.



१८ एप्रिल २०२६ : डॉ. कांचन यांनी ए बी डी सी च्या 'बी' श्रेणीतील नियतकालिका मध्ये 'लर्निंग पॅटर्न्स, एंगेजमेंट अँड मोटिवेशन अमंग पोस्टग्रॅज्युएट मॅनेजमेंट स्टुडंट्स : एव्हिडन्स फ्रॉम ॲन एम्पीरिकल स्टडी इन इंडियन बी - स्कूल' या विषयावर एक शोधनिबंध प्रकाशित केला.

३० एप्रिल २०२६ : डॉ. नीतिन जोशी यांनी एलआयसीचे संयोजक म्हणून जीएनव्हीएसच्या पीएचडी केंद्राला भेट दिली.

३० एप्रिल २०२६: नवीन कार्यक्रमाच्या सहकार्यासाठी डिजिटल मार्केटिंग आणि वेल्थ मॅनेजमेंट क्षेत्रातील उद्योग व्यावसायिकांना आमंत्रित करून 'कॉन्फ्लुएन्स' या नेटवर्किंग आणि सहयोग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



### डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे दोन नवीन पदव्युत्तर पदविका (पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा) कार्यक्रम सुरू


डिजिटल परिवर्तन, कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्थिक नवोपक्रम आणि बदलत्या जागतिक बाजारपेठेच्या वेगवान गतीने उद्योग / व्यावसायाला लक्षणीयरीत्या नव्याने आकार दिला आहे. स्पर्धात्मक आणि शाश्वत राहण्यासाठी, औद्योगिक संस्था आणि व्यावसायिक; डेटा-आधारित धोरणे, ऑटोमेशन, प्रेडिक्टिव्ह नालिटिक्स आणि बुद्धिमान निर्णय-प्रणालींवर अधिकाधिक अवलंबून आहेत.

उद्योगाच्या या उदयोन्मुख गरजांना प्रतिसाद म्हणून, उच्च शिक्षण संस्थांसाठी पारंपरिक व्यवस्थापन शिक्षण आणि पुढच्या पिढीच्या तांत्रिक क्षमतांमधील दरी सांधणारे विशेष, कौशल्य-केंद्रित पदव्युत्तर कार्यक्रम तयार करणे अत्यावश्यक ठरते. त्या अनुसार विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. व्ही. एन. ब्रिम्स तर्फे दोन पदव्युत्तर पदविका (पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा) कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत.

### डिजिटल मार्केटिंग आणि एआय (PGD-DMAI)




### एआय नालिटिक्ससह गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन (PGD-IWMA)




रोजगारक्षमता आणि उद्योजकतेची तयारी वाढवण्यासाठी अभ्यासक्रमात आधुनिक साधने, लाइव्ह प्रोजेक्ट्स, इंटर्नशिप, एआय-सक्षम ॲप्लिकेशन्स आणि व्यावहारिक प्रशिक्षणाचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाची रचना खालील बाबींद्वारे अनुभवात्मक शिक्षणावर भर देते:

- इंडस्ट्री इंटर्नशिप आणि फील्ड वर्क (८ क्रेडिट्स)
- २ प्रोजेक्ट्स (प्रत्येकी ४ क्रेडिट्स)
- लॅब आधारित ट्युटोरियल्स
- कौशल्य-केंद्रित ऐच्छिक विषय

**या अभ्यासक्रमाची रचना खालील बाबींशी सुसंगत आहे :**

- राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020)
- परिणाम-आधारित शिक्षण (OBE) तत्त्वे

नैतिक आणि जबाबदार व्यावसायिक पद्धतींचे पालन करत, विपणन (मार्केटिंग) आणि वित्तीय (फायनान्शिअल) क्षेत्रांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, नालिटिक्स आणि डिजिटल साधनांचा उपयोग करण्यास सक्षम, उद्योगासाठी तयार असे व्यावसायिक निर्माण करणे, हे या अभ्यासक्रमांचे उद्दिष्ट आहे.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

### औद्योगिक भेटीद्वारे विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर उद्योगाची प्रत्यक्ष ओळख

दिनांक ०३ एप्रिल २०२६ रोजी संगणक अभियांत्रिकी, तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागांच्या संयुक्त विद्यमाने चंदीगड येथील TCIL-IT या नामांकित सॉफ्टवेअर उद्योगाला औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीत SE, TE आणि BE वर्गातील एकूण ३१ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.



या औद्योगिक भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर उद्योगातील प्रत्यक्ष कामकाज, विविध प्रक्रिया आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची वास्तव माहिती मिळवून देणे हा होता. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कंपनीचा सविस्तर दौरा करून सॉफ्टवेअर विकास प्रक्रियेची माहिती देण्यात आली. तसेच विविध विभागांची कार्यपद्धती, प्रोजेक्ट मॅनेजमेंट आणि टीमवर्क याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले. उद्योगातील तज्ज्ञांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान, सध्याचे ट्रेंड्स आणि करिअरच्या संधींबाबत मौल्यवान माहिती मिळाली.

या भेटीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सैद्धांतिक ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग कसा होतो याची स्पष्ट जाणीव झाली. तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने त्यांच्या करिअरविषयीची समज अधिक दृढ झाली.

**CNC मशीन प्रात्यक्षिकासाठी विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट**

दिनांक ०४ एप्रिल २०२६ रोजी एलिमेंट्स ऑफ मेकॅनिकल इंजिनीअरिंग या विषयाच्या अंतर्गत प्रथम वर्ष मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मोडकागर येथील पेठे ब्रेक मोटर्स या उद्योगाला भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना CNC मशीनच्या प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळवून देणे हा होता.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना CNC मशीनिंग प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळाली. तसेच आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, औद्योगिक कार्यपद्धती आणि रिअल-टाइम ऑपरेशन्स यांचा सखोल अनुभव घेण्याची संधी मिळाली. यामुळे विद्यार्थ्यांच्या सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुप्रयोग यांमधील दरी कमी होण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांनी उद्योगातील तज्ज्ञांशी सक्रियपणे संवाद साधून मशीन ऑपरेशन, सुरक्षा पद्धती आणि उत्पादन प्रक्रियेविषयी मौल्यवान माहिती मिळवली.

**नवोपक्रमशील संशोधनातून विज्ञानाचा शाश्वत विकास**

दिनांक ०७ ते ०८ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्या वतीने 'विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी नवोपक्रमशील संशोधन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.



या परिषदेत विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शाश्वत विकासासाठी नवोपक्रमशील संशोधन हाच प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन नॅशनल सेंटर फॉर सायन्स कम्युनिकेशन (NCSM), मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास नाईक-साटम यांनी केले. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, शाश्वत ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डेटा सायन्स यांसारख्या विविध विषयांवर आधारित या परिषदेत विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व तज्ज्ञांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. परिषदेत एकूण ६२ संशोधक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला असून विज्ञान, अभियांत्रिकी, शिक्षण आणि तंत्रज्ञानाशी संबंधित विषयांवर ४४ संशोधन निबंध सादर करण्यात आले.

या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक उपयोगिता असलेल्या संशोधनाची दिशा मिळाली. तसेच उद्योग व तंत्रज्ञान क्षेत्राशी विद्यार्थ्यांना जोडण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न या माध्यमातून करण्यात आल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

## इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाची औद्योगिक भेट

दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाने ठाणे येथील अशिधा इलेक्ट्रॉनिक्स या उद्योगाला औद्योगिक भेट आयोजित केली. या भेटीत तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे एकूण १६ विद्यार्थी, तसेच ०२ प्राध्यापक सहभागी झाले होते.




या औद्योगिक भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना विद्युत प्रणालीतील संरक्षण (Protection Systems), स्विचगियर (Switchgear) आणि SCADA प्रणालींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळवून देणे हा होता.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी पॉवर सिस्टीम प्रोटेक्शनचे प्रत्यक्ष अनुप्रयोग, विविध स्विचगियरचे कार्य आणि SCADA प्रणालीद्वारे रिअल-टाइम मॉनिटरिंग व कंट्रोल कसे केले जाते याचा अभ्यास केला.

## प्रा. सतिश घोरपडे यांना पीएच.डी. प्राप्त

महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख प्रा. सतिश घोरपडे यांनी पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रा. घोरपडे यांचा गौरव करण्यात आला.



प्रा. घोरपडे यांनी "Integration of Parabolic Trough Collectors with Existing Coal Based Thermal Power Plant for Coal Consumption Reduction and Carbon Emission Reduction" या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. त्यांच्या संशोधनात 'पारंपरिक कोळशावर आधारित वीज निर्मितीत सौर उर्जेचा वापर करून कोळशाचा वापर कमी करणे आणि कार्बन उत्सर्जनात घट घडवून आणणे' यावर भर देण्यात आला आहे. त्यांनी कोळशावर चालणाऱ्या वीज प्रकल्पात सौर उर्जेची जोड देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे वीज निर्मिती अधिक पर्यावरणपूरक होण्यास मदत होते. हे संशोधन १२०० मेगावॅट क्षमतेच्या JSW Energy च्या वीज प्रकल्पाच्या संदर्भात करण्यात आले आहे.

या यशाबद्दल आयोजित सत्कार समारंभात डॉ. घोरपडे यांनी आपल्या संशोधन प्रवासाचा आढावा मांडला. तसेच उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अभियांत्रिकी शिक्षणाच्या जागवल्या आठवणी : माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात

दिनांक ११ एप्रिल रोजी महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या अभियांत्रिकी शिक्षणाच्या आठवणींना उजाळा देत जुन्या अनुभवांची देवाणघेवाण केली. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, तसेच परस्परांमधील संवाद व संपर्क वाढवणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच काही विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातूनही सहभाग नोंदवला. या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणकाळातील विविध आठवणींना उजाळा देत महाविद्यालयाशी असलेले नाते अधिक दृढ केले. तसेच त्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांनी आपल्या मार्गदर्शनात अशा मेळाव्यांमुळे माजी विद्यार्थ्यांशी संवाद वाढतो व संस्थेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

**विद्यार्थ्यांची सुझलॉन पवनऊर्जा प्रकल्पाला शैक्षणिक भेट**

दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाच्या वतीने सदावाघापूर (ता. पाटण, जि. सातारा) येथील Suzlon Wind Power Plant येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीत विविध शाखांतील (इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, इन्स्ट्रुमेंटेशन) SE वर्गातील एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रा. प्रीती साठे व प्रा. यश आंबवकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना दोन मेगावॅट क्षमतेच्या पवन टर्बाइनचे कार्य, Pitch व Yaw कंट्रोल प्रणाली, तसेच Doubly Fed Induction Generator (DFIG) द्वारे ऊर्जा निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. SCADA प्रणालीद्वारे पवनऊर्जा प्रकल्पाचे रिअल-टाइम मॉनिटरिंग व नियंत्रण कसे केले जाते, याची माहितीही देण्यात आली.

तसेच, निर्मित वीज उपकेंद्राकडे कशी पाठविली जाते, ग्रिडशी समक्रमण (Grid Synchronization) आणि Reactive Power Compensation यासंबंधी प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. भारतातील नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात सुझलॉनचे योगदान व पर्यावरणपूरक उपक्रम याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची इनक्युबेशन सेंटरला भेट**

दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी RMCET, आंबव येथील इनक्युबेशन सेंटरला शैक्षणिक भेट दिली.




या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना स्टार्टअप संस्कृती, नवोपक्रम (Innovation) आणि उद्योजकतेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. इनक्युबेशन सेंटरमधील विविध प्रकल्प, कल्पना विकसित करण्याची प्रक्रिया आणि उपलब्ध सुविधा यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. तसेच, विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी, तांत्रिक कौशल्यांचा वापर करून व्यवसाय कसा उभारता येतो याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.